cmyk

## संपादकीय

### अमेरिकाइराण संघर्ष : तर मानव जातीला किंमत चुकवावी लागेल!

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आता जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा पुरवठा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाला हादरे देणारा ठरू लागला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक भूमिकेमुळे आणि इराणच्या ठाम प्रतिकारामुळे या संघर्षाला अधिकच तीव्रता प्राप्त झाली आहे. सध्या तरी या युद्धाचा शेवट जवळ दिसत नसून, परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गुंतागुंतीची होत चालली आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२० | बुधवार दि.०८ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# देशात फक्त ९४% पावसाचा अंदाज; खरीप पट्ट्यात तूट, शेतकऱ्यांची चिंता वाढली

## एल–निनोचा प्रभाव! २०२६ मॉन्सून सरासरीपेक्षा कमी; स्कायमेटचा इशारा

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**स्कायमेट या खाजगी हवामान अंदाज संस्थेने २०२६ च्या मॉन्सून हंगामात अर्थात जून ते सप्टेंबर दरम्यान दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता मंगळवारी (ता.७) व्यक्त केली आहे. एल–निनोच्या प्रभावामुळे देशात २०२६ च्या मॉन्सून हंगामामध्ये दीर्घकालीन सरासरीच्या ९४ टक्के पाऊस होईल, असा अंदाज स्कायमेटच्या वर्तवला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढणार आहे.**

देशात मॉन्सून हंगामात दीर्घकालीन सरासरी ८६८.६ मिलीमीटर पाऊस पडतो. परंतु यंदाच्या हंगामात ८१६ मिलीमीटर पावसाचा अंदाज स्कायमेटने दिला आहे. यामध्ये स्कायमेटने उणे–अधिक ५ टक्के तफावत गृहीत धरली आहे. मॉन्सूनमध्ये ९६ ते १०४ टक्के पाऊस सरासरी मानला जातो. परंतु यंदा मात्र ९० ते ९५ टक्केच पाऊस राहील, असा शक्यताही स्कायमेट वर्तवली आहे. स्कायमेटच्या अंदाजानुसार जून आणि जुलै महिन्यात पाऊस सरासरी इतका राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मॉन्सूनची सुरुवात दमदार होण्याची



### एल–निनोचा प्रभाव

“ स्कायमेटचे व्यवस्थापकीय संचालक जतिन सिंग यांच्या मते, ‘‘मागील दीड वर्ष ला–नीना स्थिती होती. आता प्रशांत महासागरात एल–निनो साउदर्न ऑसिलेशन अर्थात ईएनएसओ सामान्य स्थितीत आला आहे. त्यामुळे लवकरच एल–निनो विकसित होण्याची चिन्हं आहेत. मॉन्सून हंगामाच्या पूर्वार्धात एल–निनो आणखी मजबूत स्थितीत येईल. तर उत्तरार्धात एल–निनोचा प्रभाव सक्रिय होईल, त्यामुळे पावसाचे वितरण असमान होईल,‘‘ असे त्यांनी सांगितले.

चिन्हं आहेत. परंतु ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात मात्र सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता असून पावसाचे वितरण असमान राहण्याचा अंदाज आहे. तसेच देशाच्या काही भागात अतिवृष्टी तर काही भागात पावसाचे खंड पडतील, असे स्कायमेट सांगितले.मध्य, पश्चिम आणि उत्तर भारतातील ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तर पाकचे किती तुकडे होतील देवच जाणे– राजनाथ सिंह

नवी दिल्ली: पश्चिम बंगालवर हल्ला करण्याचे वक्तव्य करणा–या पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. आसिफ यांनी चिथावणीखोर वक्तव्य करु नये असा सल्ला देताना राजनाथ सिंह यांनी बंगालकडे नजर टाकली तर पाकिस्तानचे किती तुकडे होतील हे फक्त देवालाच माहीत असा स्पष्ट इशारा दिला आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी इराणयुद्धाच्या काळात पाकिस्तानने काही आगळीक करण्याचा प्रयत्न केल्यास जोरदार प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर रागाने लालबुंद झालेल्या पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी पश्चिम बंगालमधील कोलकातावर हल्ला करण्याचे वक्तव्य केले होते. यावरुन राजनाथ सिंह यांनी आसिफ यांचा चांगलाच समाचार घेतला. पाकिस्तानचे दोन तुकडे झाले तेव्हा त्याचे परिणाम भोगावे लागले होते, त्यामुळे आसिफ यांनी अशी चिथावणीखोर वक्तव्य करू नये असा सल्ला सिंह यांनी दिला.

### आजपासून एअर इंडियाचा प्रवास महागला

नवी दिल्ली: एअर इंडियाने इंधनावरचा सरचार्ज वाढवला आहे. त्यामुळे एअर इंडियाच्या विमानांची तिकिटे महागणार आहे स्पष्ट आहेत. नवे दर ८ एप्रिलपासून म्हणजेच रात्री १२ वाजल्यानंतर वाढणार आहेत. एअर इंडिया एक्स्प्रेसतर्फे ज्या विमानांचे उड्डाण होते. त्या विमानांच्या तिकिटांचे दरही वाढणार आहेत. बांगलादेश, जपान, हाँगकाँग आणि दक्षिण कोरिया येथील उड्डाणासाठी विमानाच्या तिकिट दरांमध्ये एअर इंडियाने फ्युएल चार्ज वाढवला आहे. त्यामुळे विमानचे तिकिट महागले आहे. ८ एप्रिलपासून नवे दर लागू होतील. त्यामुळे आता एअर इंडिया किंवा एअर इंडिया एक्स्प्रेस या विमानांनी प्रवास करायचा असेल तर तुमच्या खिशाला अधिकची झळ बसणार आहे यात शंकाच नाही. एअर इंडियाने असे संकेत दिले आहेत की, आंतरराष्ट्रीय मार्गांवरील इंधन अधिभारातही सुधारणा करण्यात आली आहे, ज्यामुळे तेथील तिकिट दरांवरही परिणाम होऊ शकतो. एकूणच, ८ एप्रिलपासून एअर इंडियाने प्रवास करणे प्रवाशांसाठी अधिक महाग होऊ शकते, कारण वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम भाड्यांमध्ये दिसून येत आहे.

# १२ गुन्हे, २४ अधिकारी, ३० साक्षीदार अन् ४ हजार ६५० व्हिडीओ लिंक डिलीट

## भोंदू खरात प्रकरणी तेजस्वी सातपुतेंची मोठी माहिती



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. या भोंदू अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली अटक झालेली असून तो सध्या कोठडीत आहे. भोंदू खरातची एसआयटीद्वारे चौकशी केली जात असून, दररोज या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर येत आहे. याच अशोक खरात प्रकरणी आतापर्यंत तपासात काय–काय माहिती समोर आली याबाबतची सविस्तर माहिती मंगळवारी एसआयटीच्या प्रमुख आयपीएस तेजस्वी सातपुते यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. तेजस्विनी सातपुते म्हणाल्या, अशोक खरात प्रकरणाबाबतचे एकूण ▶▶ पान २ वर

### प्रकरणात ईडीची एन्ट्री

अशोक खरातचे आर्थिक व्यवहार, त्याची संपत्ती याबाबत देखील अनेकांच्या मनात प्रश्न आहेत. मात्र, याबाबत ईडीने दखल घेतली असून, ईडीने एसआयटीकडून जी माहिती मागितली होती ती सर्व माहिती एसआयटीने ईडीला दिलेली आहे, असंही तेजस्विनी सातपुते यांनी स्पष्ट केले आहे.

### ३० पेक्षा अधिक साक्षीदारांकडे विचारपूस

आतापर्यंत एसआयटीने केलेल्या तपासादरम्यान ३० पेक्षा जास्त साक्षीदारांकडे विचारपूस केली. साक्षीदारांकडे आणि पीडित महिलांकडे जी चौकशी केली त्यानुसार आरोपी हा पीडित महिलांचा गैरफायदा घेत होता. आरोपी हा त्यांना भिती दाखवत होता. खडे, रुद्राक्ष, चिंचुके, विधी अशा विविध माध्यमांतून आरोपी हा पैसे उकळण्याचे काम करत होता. तसेच आरोपी हा दैवी शक्तीची भिती दाखवत असायचा. पीडितांच्या कुटुंबियांच्या मृत्यूची भीती दाखवून बदनामी करण्याची धमकी देऊन लैंगिक शोषण करत होता, अशी माहिती समोर आली असल्याचे तेजस्विनी सातपुते यांनी सांगितले.

### आक्षेपार्ह व्हिडीओच्या ४६५० लिंक डिलीट केल्या

या घटनेतील पीडितांचे आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल झाले होते, त्या व्हिडीओच्या एकूण ४६५० लिंक सायबर टीमने डिलीट केल्या आहेत. यासाठी ४ जणांची टीम काम करत असून, आणखी लक्ष ठेऊन आहे. तसेच या घटनेबाबत सोशल मीडियावर पुन्हा–पुन्हा शेअर करणारे ४५१ अकाउंट कायमस्वरुपी बंद करण्यात आलेले आहेत. तसेच पीडितांचे आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणी आतापर्यंत दोन गुन्हे दाखल झालेले आहेत, अशी माहिती तेजस्विनी सातपुते यांनी दिली आहे.

# बीडचे ज्ञानोबा मुंडे यांना राज्यपाल पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**



**परळी तालुक्यातील मौजे पांगरी येथील पोलीस पाटील ज्ञानोबा भगवानराव मुंडे यांची सन २०२५–२६ या वर्षासाठीच्या पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि पोलीस प्रशासनाला वेळोवेळी दिलेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल त्यांना हा बहुमान जाहीर झाला आहे.**

या पुरस्कारासाठीची निवड प्रक्रिया २६ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे पार पडली. बीड पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत आणि प्रभारी पोलीस उपाधीक्षक श्री. उमाशंकर कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शासनाच्या सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या प्रस्तावांमधून मुंडे यांच्या एकमेव प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, ▶▶ पान २ वर

# एक संपूर्ण संस्कृती कायमची नष्ट होईल ट्रम्प यांचा इराणला निर्वाणीचा इशारा

**वॉशिंग्टन । वृत्तसंस्था**

**परिस्थिती न सुधारल्यास इराणची संस्कृती रात्रीपर्यंत नष्ट होऊ शकते, असा खळबळजनक दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. दरम्यान, ट्रम्प यांच्या युद्धपिपासू धोरणाने जागतिक वर्तुळात गोंधळाचे वातावरण निर्माण केले आहे. कठोर शब्दांतील इशारे आणि वारंवार मुदतवाढ यामुळे अमेरिकेची नेमकी रणनीती काय, याबद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत.**



ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपली भूमिका मांडताना ट्रम्प म्हणाले की, ‘‘आज रात्री एक संपूर्ण संस्कृती कायमची नष्ट होईल, जी पुन्हा कधीही उभी राहू शकणार नाही. मला असे घडावे असे वाटत नाही, पण बहुधा ते घडेलच.‘‘ ट्रम्प यांनी हा इशारा देतानाच, परिस्थितीनुसार शेवटच्या क्षणी हल्ला रद्द होऊ शकतो, असे संकेतही दिले. त्यांनी आजच्या रात्रीला जागतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा क्षण असे संबोधले आहे. आता आपल्याकडे पूर्ण आणि संपूर्ण सत्तापालट झाला आहे. जिथे अधिक हुशार ▶▶ पान २ वर

# फडणवीसांचे विधान म्हणजे ‘लोका सांगे ब्रम्हज्ञान..–हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई । प्रतिनिधी**

‘बारामती विधानसभेची पोटनिवडणूक जनभावना लक्षात घेऊन बिनविरोध व्हायला हवी’’ हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान म्हणजे ‘लोका सांगे ब्रम्हज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण’, असे आहे, असा सणसणीत टोला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, जी जनभावना आहे त्याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच दुर्लक्ष करत आहेत. बारामतीत अजित पवार यांचा झालेला विमान अपघात हा अपघात होता की घातपात याचे शंका निरसन व्हावे ही महाराष्ट्राची खरी जनभावना आहे. विमान अपघात प्रश्नी एफआयआर दाखल करून ताबडतोब चौकशी करण्याचे कर्तव्य फडणवीस यांना करता आले असते पण त्यांनी ते केलेले नाही, त्याकडे ते दुर्लक्ष ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.०७ एप्रिल २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: १९३.०० क्विंटल | | |
| २,०७० | २,८०१ | २,८०१ |
| ज्वारी/हायब्रिड: ३०५.०० क्विंटल | | |
| २,४०० | ४,९५० | ३,३३४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.५० क्विंटल | | |
| ७,४३० | ७,४३० | ७,४३० |
| उडीद : २.५० क्विंटल | | |
| ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ४४.५० क्विंटल | | |
| २,५९५ | ३,२९० | २,९१८ |
| मुग: २.०० क्विंटल | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | | |
| ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: १४.५० क्विंटल | | |
| ४,३६८ | ५,१५१ | ४,८८४ |

# पुण्यात ड्रग्ज विरोधात पोलीस ॲक्शन मोडमध्ये

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात वाढत्या ड्रग्सच्या विळख्याविरोधात आता पुणे पोलिसांनी आक्रमक मोहीम सुरु केली आहे. पुणे पोलिसांकडून ड्रग्स पेडलर्सना थेट इशारा देण्यात आला आहे. ‘‘शहरातून ड्रग्स पूर्णपणे हद्दपार होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही,’’ असा कडक संदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे ▶▶ पान २ वर

# आरबीआयने केला महाराष्ट्रातील एका बँकेचा परवाना रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया देशातील विविध बँकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचं काम करते. बँका, वित्तीय संस्था, फायनान्स कंपन्या यांच्या कामकाजाची तपासणी देखील आरबीआयकडून केली जाते. ज्या बँका बँकिंग नियमन कायदा आणि आरबीआयच्या विविध मार्गदर्शक सूचनांचं पालन करत नाहीत त्यांच्यावर आरबीआयकडून कारवाई केली जाते. महाराष्ट्रातील एका बँकेचा परवाना आरबीआयनं रद्द केला आहे. एका बँकेला आर्थिक दंड करण्यात आला आहे.

आरबीआयकडून द शिरपूर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शिरपूर या बँकेचा परवाना २ एप्रिलच्या आदेशानं रद्द करण्यात आल्याचं म्हटलं आहे. आरबीआयनं ही कारवाई बँकिंग नियमन कायदा १९४९ च्या सेक्शन २२ आणि सेक्शन ५६ चा ▶▶ पान २ वर

# राज्यातील ११ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई । प्रतिनिधी**




**राज्य सरकारने आज तब्बल ११ आयएएस अधिका–यांच्या बदलीचे आदेश काढले. राज्य सरकारकडून अनेकवेळा बदल्यांची ऑर्डर काढण्यात आली आहे.**

फडणवीस सरकारकडून प्रशासनातील बदल्यांचा धडाका कायमच असून अधिका–यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. एप्रिलच्या दुस–या आठवड्यात अधिका–यांच्या बदल्या झाल्या आहेत, ज्यामध्ये अनेक बड्या समावेश आहे. सर्व अधिका–यांना लवकरात लवकर पदभार स्वीकारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान राहुल रंजन महिवाल (आयएएस:आरआर:२००५), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे यांची महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथे सदस्य सचिव म्हणून बदली झाली आहे. श्वेता सिंघल (आयएएस:आरआर:२००९) यांची महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे विशेष निवासी आयुक्त म्हणून बदली झाली आहे. रुचेश जयवंशी (आयएएस:आरआर:२००९) यांची महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे येथे व्यवस्थापकीय संचालक म्हणून बदली झाली आहे. कन्हूराज बागटे (आयएएस:एससीएस:२०११) यांची महावितरण, कल्याण येथे सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून बदली झाली आहे. लक्ष्मण राऊत (आयएएस:एससीएस:२०१५), सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क ▶▶ पान २ वर

# ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई । प्रतिनिधी**

**जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या ‘‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’’ या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. राज्य शासनाने ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# अवकाळी थैमान : कष्टावर पाणी शेतकरी हवालदिल

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीच्या तडाख्याने शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. ऐन कापणीच्या आणि तोडणीच्या हंगामात निसर्गाने घेतलेल्या या पलटीमुळे बळिराजाच्या हातातोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला गेला आहे. द्राक्ष, केळी, आंबा यांसारख्या फळबागांसह गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या रबी पिकांचे झालेले मोठे नुकसान केवळ शेतीपुरते मर्यादित नसून त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थचक्रावर होणार आहेत.

सांगली, सोलापूर, फलटण, सांगोला, बारामती, इंदापूर या द्राक्षपट्ट्यांमध्ये गारपिटीने अक्षरशः थैमान घातले. तोडणीच्या उंबरठ्यावर असलेल्या द्राक्षबागांमधील मण्यांना तडे जाऊन मालाचा दर्जा घसरला. निर्यातक्षम द्राक्षांचे नुकसान झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी हुकल्या आणि स्थानिक बाजारात दर कोसळले. कष्टाने पिकवलेला माल कवडीमोल दराने विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. जळगाव परिसरात वादळी वाऱ्याने केळीच्या बागा जमीनदोस्त केल्या, तर मराठवाड्यात आंबा बागांना मोठा फटका बसून उत्पादनात ५० ते ६० टक्क्यांची घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.या संकटाची व्याप्ती केवळ फळबागांपुरती मर्यादित नाही. गहू, हरभरा, ज्वारी यांसारखी काढणीला आलेली पिके आडवी पडली आहेत. कांदा आणि भाजीपाला पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील सुमारे १.२२ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली आहेत. ही आकडेवारी केवळ संख्या नसून हजारो शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या स्वप्नांची साक्ष आहे. निसर्गाच्या या लहरीपणामागे हवामान बदलाचे वाढते संकट स्पष्ट दिसते. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार अरबी समुद्रातून येणारे बाष्पयुक्त वारे आणि स्थानिक कमी दाबाचे पट्टे यामुळे राज्यात अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. यामुळेच अवकाळी पावसाचे प्रमाण वाढत असून त्याची तीव्रताही अधिक होत आहे. ही केवळ एक तात्पुरती आपत्ती नसून भविष्यात अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकणारा इशारा आहे.शासनाने परिस्थितीची दखल घेत पंचनामे करण्याचे आणि मदत देण्याचे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्षात मदतीचा वेग आणि पारदर्शकता यावरच शेतकऱ्यांचा विश्वास टिकून आहे. अनेकदा अशा आपत्तीनंतर मदत उशिरा मिळते किंवा ती अपुरी ठरते, हा अनुभव शेतकऱ्यांनी वारंवार घेतला आहे. त्यामुळे यावेळी तातडीने, पुरेशी आणि थेट मदत देणे अत्यंत आवश्यक आहे. विमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पीकनुकसान भरपाईचे योग्य मूल्यांकन आणि कर्जमाफीसारख्या उपाययोजना तातडीने राबवणे गरजेचे आहे. यासोबतच दीर्घकालीन उपाययोजनांवरही भर देणे तितकेच महत्त्वाचे आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती पद्धती, हवामानानुसार पीकपद्धतीत बदल, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि जलव्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. फळबागांसाठी संरक्षक जाळ्या, हरितगृह शेती, तसेच हवामान पूर्वसूचना प्रणाली अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. अवकाळी पावसाचा हा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा आहे. शेतकरी अडचणीत सापडला तर त्याचा परिणाम बाजारपेठ, रोजगार आणि अन्नपुरवठ्यावर होतो. त्यामुळे या संकटाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता व्यापक आर्थिक आणि सामाजिक संकट म्हणून पाहणे गरजेचे आहे.आज बळिराजा पुन्हा एकदा संकटात उभा आहे. त्याच्या डोळ्यांतील आशा आणि कष्टांचे चीज होण्याची अपेक्षा या अवकाळी पावसाने धुळीस मिळवली आहे. अशा वेळी शासन, प्रशासन आणि समाजाने एकजुटीने पुढे येऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच खरी काळाची गरज आहे. नाहीतर ''शेतकरी वाचला तर देश वाचेल'' ही घोषणा केवळ घोषणाच राहण्याचा धोका आहे.

# योगेश्वरी वधु-वर सूचक मंडळाचे कार्य कौतुकास्पद-राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**दिवसेंदिवस बिकट बनत चाललेल्या विवाह समस्ये विषयी जागरूकता निर्माण करीत अनेक विवाह जुळविणाऱ्या योगेश्वरी वधु-वर मंडळाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते ०६ एप्रिल सोमवार रोजी भट गल्लीतील राम मंदीरात योगेश्वरी वधु वर सूचक मंडळाच्या वधु-वर परिचय पुस्तिका प्रकाशन व समाजभुषण पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.**

अध्यक्षस्थानी राम मंदीर चे मठाधिपती गदाधर बुवा रामदासी होते. व्यासपीठावर अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, दिनदयाळ ना. सह.बँकेचे अध्यक्ष ऍड. मकरंद पत्की,माजी नगरसेवक संजय लोणीकर,ह.भ. प. अंबादास महाराज चिक्षे,योगेश्वरी देवल कमेटीचे संचालक उल्हास पांडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना मोदी म्हणाले की,सामाजिक क्षेत्रात योगेश्वरी वधु- वर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने सामाजिक जबाबदारीचे जे बहुमोल कार्य केले आहे ते अवर्णनीय आहे. त्यांच्या प्रयत्नातून अनेक विवाह जुळले अलिकडच्या काळात वधु वर सूचक मंडळ काळाची गरज बनल्याचे सांगून ज्यांना समाजभुषण पुरस्कार मिळाले त्यांची जबाबदारी वाढली असल्याचे त्यांनी सांगितले. मकरंद पत्की म्हणाले की,योगेश्वरी वधु-वर सुचक मंडळाच्या वतीने विवाह जुळविण्याचे काम होते ही आताच्या काळात मोठी गोष्ट असल्याचे सांगून समाजभूषण पुरस्कार प्राप्त झालेल्यांचे त्यांनी अभिनंदन केले.अंबादास चिक्षे यांनीही मंडळाचे कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगून समाजभूषण पुरस्कार प्राप्त झालेल्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षीय समारोपात गदाधर बुवा रामदासी यांनी वधु-वर सूचक मंडळाच्या कार्याचे कौतुक करून समाज भुषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. मान्यवरांचे स्वागत बाबुराव बाभुळगांवकर,अशोक टाकळकर, राहूल देशपांडे, राजश्री पिंपळे, कल्याणी सोनेसांगवीकर, आदींनी केले. प्रास्तविक श्रीपाद चिक्षे यांनी केले संचालन आनंद टाकळकर यांनी तर उपस्थितांचे आभार स्मिता भातलवंडे यांनी मानले. यावेळी विविध संघटनाचे पदाधिकारी संचालक, महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारायणगड नारळी सप्ताहाच्या सांगतेला भाविकांची अलोट गर्दी

## उमापुर येथील नारळी सप्ताह उत्साहात साजरा-ह.भ.प मठाधिपती शिवाजी महारा

कोळगाव । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उमापुर उमादेवी नगरी येथील ७४ वा श्रीक्षेत्र नगदनारायण गड च्या नारळी सप्ताहात गेल्या सात दिवसांपासून राज्यभरातील संत-महंत, किर्तनकार,भजनी मंडळी यांच्या उपस्थितीने विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. या कार्यक्रमासह प्रबोधनात्मक कार्यक्रम घेवून सप्ताहाने नावलौकिक मिळवला. विशेष म्हणजे उमापुर गावातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी हा धर्म सांस्कृतिक कार्यक्रम एकत्र येऊन उत्साहात साजरा केला. तसेच या सप्ताहाची सांगता दि.०७ एप्रिल रोजी श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती हभप शिवाजी महाराज यांनी काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी नारायण गडाच्या पंचक्रोशीतील हजारो भाविकांची अफाट गर्दीने परिसर फुलून गेला होता.

या नारळी सप्ताहाच्या सांगतेला जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात भाविक वर्ग या ठिकाणी काल्याच्या किर्तनासाठी उपस्थित होता. तसेच नारायण गडाच्या पंचक्रोशीतील हजारो भाविकांची अफाट गर्दीने परिसर फुलून गेला होता. उपस्थित भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटत करण्यात आले. तर सप्ताहाच्या समारोपासाठी सकाळ पासूनच हजारो भाविकांची गर्दी जमली होती. माजी मंत्री बदामराव पंडित, आमदार धनंजय मुंडे, आमदार विजयसिंह पंडित, माजी सभापती युध्दाजित पंडित, परमेश्वर महाराज वाघमोडे, नारायण गडाचे ट्रस्टचे विश्वस्त मंडळ, राजकीय, सामाजिक, पत्रकार, धार्मिक आदी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हजेरी लावली होती. तर या सप्ताहात यशस्वीतेसाठी मादळमोही येथील सर्व ग्रामस्थ, सप्ताह समिती यांनी अथक प्रयत्न केले असून मोठे योगदान आहे. ७४ वा नारळी सप्ताह यंदाच्या वर्षी चे उमापुर मारोतीचीवाडी येथील नागरिकांनी भव्य दिव्य नारळी सप्ताहाचे आयोजन गडाचे उत्तराधिकारी हभप संभाजी महाराज, श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड संस्थान चे मठाधिपती महंत दत्ता महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. या नारळी सप्ताह तून सात दिवसांमध्ये लाखो भाविक भक्तांची गर्दी होती. सर्व युवक गावकरी यांनी एकत्र येऊन या कार्यक्रमासाठी श्रमदान असो अन्नदान पंगती वाढविणे, असे सपताहाचे काम एकत्र येऊन पार पाडली. यामुळे आनंद वाढवला. तसेच अन्नदान पाणी व्यवस्था बैठक व्यवस्था व्यवस्था चोख पद्धतीने राबविण्यात आली यासाठी माध्यमे गावातील आणि परिसरातील विविध प्रकारच्या सेवा समितीच्या स्वंयसेवकांनी कार्य केले या जोरावर हा सप्ताह उत्कृष्ट नियोजनबद्ध पार पडला असून या नारळी सप्ताहाची चर्चा सर्वत्र होत आहे.

# महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर जयंती सणाच्या निमित्ताने सर्व शिक्षकांचे वेतन १० एप्रिल पर्यंत खात्यात जमा करा

## विनाअनुदानित शाळा कृती समितीचे शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

**क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सणाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च -२०२६ चे वेतन १० एप्रिल पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी 'बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती'च्या वतीने बीड शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सण तोंडावर आलेला असताना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना फुले आंबेडकर जयंती सण कसा साजरा करावा याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या जयंती सणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिक्षकांचे मार्च -२०२६ चे वेतन जयंतीपूर्वी, म्हणजेच १० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांनी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी बोलताना त्यांनी संच मान्यता आणि शिक्षक समायोजनाचा प्रश्न मार्गी लागण्याची प्रकिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया १० एप्रिल पर्यंत पूर्ण होईल. ही प्रक्रिया पूर्ण होताच सर्व शिक्षकांच्या खात्यावर वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम खाडे, प्रा. सोनवणे, अशोक मोरे, सुभाष मोरे, अभिमन्यू बोरखेडे, शिवप्रसाद सिरसाट, प्रा. ढास आणि प्रा. मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पडलेल्या सिग्नलचा 'करंट' प्रशासनाला कधी बसणार?

## विद्युत विभागावर कारवाईची नगरसेविका आरती बनसोडे यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील नगर रोडवर पडलेला सिग्नल नागरिकांसाठी जीवघेणा ठरण्याची शक्यता निर्माण झाली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी या गंभीर प्रकारामुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संबंधित गुत्तेदारावर कारवाई करण्यात आली असली, तरी या कामाच्या देखरेखीची जबाबदारी असलेल्या नगर परिषद विद्युत विभागाचे विभागप्रमुख उदय इपिली यांच्या हलगर्जीपणावरही बोट ठेवले जात आहे.**



स्थायी समितीच्या बैठकीत सभापती आरती बनसोडे यांनी हा मुद्दा आक्रमकपणे मांडत, ''फक्त गुत्तेदारावर कारवाई करून चालणार नाही, जबाबदार अधिकाऱ्यांवरही तात्काळ कारवाई झाली पाहिजे,'' अशी ठाम भूमिका घेतली. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे सविस्तर मागणीही केली आहे. दरम्यान, त्यांनी धानोरा रोडवरील अपूर्ण रस्ता व नाली काम, पालवण चौक परिसरातील स्वच्छतेचा अभाव, तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर केवळ स्वच्छता आणि पाणीपुरवठ्यावरच करावा, अशा विविध महत्त्वाच्या मागण्या देखील मांडल्या. या सर्व घडामोडींमुळे बीड नगर परिषद प्रशासन पुन्हा एकदा नागरिकांच्या रोषाच्या केंद्रस्थानी आले असून, आता प्रत्यक्षात कारवाई कधी होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पान १ वरून...

### देशात फक्त ९४% पावसाचा अंदाज;

मुख्य खरीप पिकांच्या भागांत पाऊस अपुरा राहण्याची शक्यता आहे. यामध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, पंजाब, हरियाणा ही राज्ये येतात. या भागांत सुमारे ६ टक्के पावसाची तूट राहू शकते. विशेषतः पंजाब, हरियाणा आणि राजस्थान या राज्यांत ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पाऊस कमी पडेल, असा स्कायमेटचा अंदाज आहे. स्कायमेटच्या अंदाजानुसार, इंडियन ओशन डायपोल सामान्य किंवा थोडासा सकारात्मक राहू शकतो. आयओडी सकारात्मक राहिल्याने जून-जुलै महिन्यात पाऊस चांगला राहू शकतो. पण दुसऱ्या उत्तरार्धात पाऊस कमी पडण्याचा धोका कायम राहून एकूण पावसाचे वितरण असमान राहील. दरम्यान, स्कायमेट ही खाजगी संस्था असून भारतीय हवामानशास्त्र विभाग (आयएमडी) २०२६ च्या मॉन्सून हंगामाचा पहिला अंदाज एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या अंदाजानंतर चित्र अधिक स्पष्ट होईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी पॅनिक न होता, आयएमडीच्या आगामी अंदाजाकडे लक्ष द्यावे, असे जाणकार सांगतात.तर पूर्व आणि ईशान्य भारतातील राज्यांमध्ये अर्थात बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, आसामसह ईशान्य राज्यात येथे पाऊस सरासरी किंवा त्यापेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. दक्षिण भारतातील केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश आदी राज्यात सरासरी पाऊस राहील अशी शक्यता स्कायमेटने व्यक्त केली आहे.

-------------

### बीडचे ज्ञानोबा मुंडे यांना

१ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता, पोलीस मुख्यालय, बीड येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. पालकमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र. २५,०००/- (पंचवीस हजार) रुपये रोख रक्कम, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री. मुंडे यांच्या या यशाबद्दल पोलीस अधीक्षक आणि संपूर्ण बीड पोलीस दलाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

---------------

### १२ गुन्हे, २४ अधिकारी, ३० साक्षीदार

११ गुन्हे एसआयटीकडे तपासासाठी आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीकडे दोन पोलीस उपअधीक्षक, तीन सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक आणि पोलीस कर्मचारी असे मिळून २४ जणांचे एसआयटीचे पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. अशोक खरातवर नाशिक आणि अहिल्यानगर जिल्हा असे एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. या १२ गुन्ह्यांपैकी ९ गुन्ह्यांचा तपास एसआयटी करत आहे, तर २ गुन्ह्यांचा तपास अहिल्यानगर पोलीस करत आहेत. तसेच एका गुन्ह्याचा तपास नाशिक शहर पोलीस करत आहेत, अशी माहिती तेजस्विनी सातपुते यांनी दिली आहे. तसेच अशोक खरात विरुद्ध नसलेले मात्र या प्रकरणाशी संबंधित असलेले असे दोन गुन्हे दाखल आहेत. त्या दोन गुन्ह्यांचा तपास देखील एसआयटी करत आहे. त्यामुळे ९ गुन्हे अशोक खरातच्या विरोधातील आणि अशोक खरातच्या विरोधात नसलेले पण याच प्रकरणाशी संबंधित असलेले दोन गुन्हे अशा एकूण ११ गुन्ह्यांचा तपास एसआयटी करत आहे. यातील एसआयटीकडे तपासासाठी आलेले ८ गुन्हे हे महिला लैंगिक अत्याचाराबाबतचे आहेत. तसेच उर्वरित ३ गुन्हे हे फसवणूक आणि अंधश्रद्धा विरोधी कायदा याबाबतचे आहेत, अशी माहिती तेजस्विनी सातपुते यांनी दिली. भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी पीडित महिला आणि कुटुंब धाडसाने पुढे आले आहे. लोक काय म्हणतील याकडे दुर्लक्ष करत पीडित महिलांनी फिर्याद दिली आहे. पीडित महिलांची ओळख पटू नये, गोपनीय ठेवणे महत्वाचे आहे. त्यांचे महिलांचे धैर्य टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलिसांच्या पत्रकार परिषदेला बंधने आहेत, असेही सातपुते यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणी ६० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करायचे आहेत. पहिल्या गुन्ह्यात आता ४० दिवस शिल्लक आहेत, इतर गुन्ह्यांची डेडलाईन जवळ आहे. ठोस पुरावे गोळा करून तपास सुरु आहे. फिर्यादी आणि साक्षीदार जे सांगतात त्यानुसार तपास केला जातो. गुन्ह्यांची पार्श्वभूमीवर बघता कुणी मदत केली असेल तर कारवाई केली जाईल. आमचा अजूनही तपास सुरू आहे. या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत गोपनीयता बाळगली जाणार आहे, असे स्पष्ट करत अशोक खरातला दुसऱ्या गुन्ह्यात अटक केली असून बुधवारपर्यंत तो पोलीस कोठीडत आहे. पुढील गुन्ह्यांत आम्ही कोठडी मागणार आहेत. काही कारणास्तव आम्ही व्हीसीद्वारे आरोपीला हजर करत आहोत, असे तेजस्विनी सातपुते सांगितले.

------------

### फडणवीसांचे विधान म्हणजे 'लोका

करत आहेत असे म्हणत, 'तेव्हा कुठे गेला होता राधासुता तुझा धर्म'? अशी विचारणा करून अजित दादांच्या अपघात प्रकरणी गुन्हा दाखल करून निष्पक्ष तपास व्हावा ही खरी जनभावना असल्याचे सांगितले.

------------

### एक संपूर्ण संस्कृती कायमची नष्ट होईल

आणि कमी कट्टर विचारसरणीची माणसे सत्तेत आहेत, तिथे कदाचित काहीतरी क्रांतिकारी घडू शकेल. कोणास ठाऊक? आज रात्री आपल्याला ते समजेलच. ४७ वर्षांचा भ्रष्टाचार आणि मृत्यूचा खेळ आता संपेल. इराणच्या महान जनतेवर देवाचे आशीर्वाद असोत, असेही ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे. ट्रम्प यांनी इराणला हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ८ एप्रिल (वेळेनुसार रात्री ८ वाजेपर्यंत) ही अंतिम मुदत दिली आहे. या सामुद्रधुनीतून इंधन पुरवठा रोखल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. भारताच्या वेळेनुसार ही मुदत बुधवारी पहाटे संपणार आहे. सुरुवातीला ट्रम्प यांनी इराणला हा जलमार्ग मोकळा करण्यासाठी ४८ तासांचा अल्टिमेटम दिला होता. मात्र, त्यानंतर ही मुदत अनेकदा वाढवण्यात आली आहे. ४८ तासांचा हा मूळ अल्टिमेटम आता ४०८ तासांच्या कालावधीपर्यंत लांबला आहे. याआधी मार्चच्या अखेरीस १० दिवसांची मुदत वाढ देण्यात आली होती, जी सोमवारी संपणार होती, परंतु तणाव कायम असल्याने ती पुन्हा एकदा वाढवण्यात आली. ट्रम्प यांच्या या धोरणाने जागतिक वर्तुळात गोंधळाचे वातावरण निर्माण केले आहे. कठोर शब्दांतील इशारे आणि वारंवार मुदतवाढ यामुळे अमेरिकेची नेमकी रणनीती काय, याबद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत. निरीक्षकांच्या मते, जरी ट्रम्प यांची भाषा आक्रमक असली, तरी वारंवार दिली जाणारी मुदतवाढ पडद्याआड सुरू असलेल्या एखाद्या गुंतागुंतीच्या मुत्सद्दी प्रयत्नांचे संकेत देत आहे. ७ एप्रिलची अंतिम मुदत जवळ आल्याने जगाचे लक्ष आता इराणच्या भूमिकेकडे लागले आहे.

------------

### आरबीआयने केला महाराष्ट्रातील

वापर करत ही कारवाई केली आहे. आरबीआयनं या बँकेला ६ एप्रिल २०२६ या दिवशी कामकाज बंद झाल्यानंतर कामकाज बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते. या बँकेवरील कारवाईबाबत महाराष्ट्राच्या सहकार आयुक्त, सहकारी संस्था नोंदणी महानिरीक्षक यांना माहिती देण्यात आली असून या बँकेचं कामकाज बंद करणे आणि लिक्विडेटर नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आरबीआयच्या प्रसिद्धीपत्रकानुसार बँकिंग कायद्यांच्या विविध कलमांनुसार द शिरपूर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शिरपूर या बँकेकडे पुरेसं भांडवल नाही. बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदींची पूर्तता करण्यास बँक अपयशी ठरली. बँकेचं कामकाज सुरु ठेवणं ठेवीदारांवर अन्यायकारक ठरेल, असं आरबीआयनं म्हटलं. बँकेची सध्याची आर्थिक स्थिती ठेवीदारांची पूर्ण रक्कम देण्याइतकी चांगली नाही. सार्वजनिक हितासाठी बँकेचं कामकाज बंद करण्यात आलं आहे. आरबीआयच्या आदेशानुसार द शिरपूर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शिरपूरचा परवाना रद्द झाल्यानं त्यांना ठेवी स्वीकारणं, ठेवीदारांच्या ठेवी परत करणे यावर बंदी घालण्यात आली आहे. बँकेचं लिक्विडेशन झाल्यानंतर या बँकेत ठेवी ज्यांच्या ठेवी आहेत त्यांच्या ५ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवींना डीआयसीजीसीचं संरक्षण मिळेल. बँकेकडून मिळालेल्या डेटानुसार बँकेचे ९९.७ टक्के ठेवीदार त्यांच्या ठेवी पूर्णपणे परत मिळण्यास पात्र असतील. डीआयसीजीसीनं या बँकेच्या ठेवीदारांना ४८.९५ कोटींची रक्कम ३१ जानेवारीपर्यंत परत केली आहे.

**आरबीआयकडून कोणत्या बँकेला दंड?**

डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, अमरावती या बँकेला आरबीआयनं १ लाख ९ हजार रुपयांचा दंड केला आहे. आरबीआयनं याचं कारण देखील सांगितलं आहे. ग्राहकांकडून निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क एनईएफटी व्यवहारांवर आकारण्यात आलं आहे.याशिवाय गुंतवणुकीसंदर्भातील नियमांची पूर्तता देखील बँकेकडून न झाल्यानं दंड केला गेला असल्याचं समोर आलं आहे.

----------------

### पुण्यात ड्रग्ज विरोधात

शहरातील ड्रग्स रॅकेटमध्ये खळबळ उडाली आहे. आतापर्यंत ड्रग्स प्रकरणात साध्या गुन्ह्यांखाली कारवाई होत होती. मात्र, आता पोलिसांनी रणनीती बदलली आहे. पोलिसांनी आता थेट मकोका () अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ड्रग्स विक्री करणाऱ्यांसाठी परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. मकोका लागल्यानंतर आरोपींना जामीन मिळवणे कठीण होते आणि दीर्घ काळ तुरुंगात राहावे लागते. विशेष म्हणजे, केवळ ड्रग्स विक्रेतेच नव्हे, तर ड्रग्स खरेदी करणारे आणि सेवन करणारेही पोलिसांच्या रडारवर आले आहेत. ''मजा म्हणून'' ड्रग्स घेणाऱ्यांनाही आता कायद्याचा फटका बसणार असल्याने तरुणांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आयुक्तांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''वेळीच मार्गावर या, अन्यथा अशी कारवाई करू की तुमच्या पुढच्या पिढ्याही लक्षात ठेवतील.

---------------

### राज्यातील ११ आयएएस

संरक्षण आयोग, मुंबई यांची महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली आहे. गीतांजली बाविस्कर (आयएएस:एससीएस:२०१५), मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांची सहसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदली झाली आहे. डॉ. दिलीप जगदाळे (आयएएस:एससीएस:२०१५), सह व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, कल्याण यांची सहसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदली झाली आहे. पंकज देवरे (आयएएस:एससीएस:२०१६) यांची सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई येथे बदली झाली आहे. मीनल करनवाल (आयएएस:एससीएस२०१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांची प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प , मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. करिश्मा नायर (आयएएस:एससीएस २०२१) अतिरिक्त महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. अमित रंजन (आयएएस:एससीएस २०२२) प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, केळापूर उपविभाग, यवतमाळ यांची अतिरिक्त महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

-------------

### 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव'

उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना ''आरोग्यसंपन्न गाव'' म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ८ एप्रिल २०२६


## थोडक्यात



### समुद्रातील पाणी दुष्काळी भागाकडे वळवण्याची संकल्पना; मराठवाड्यासाठी दीर्घकालीन उपाय

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा व शिरूर कासार या दुष्काळी पट्ट्यासाठी १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने विकासाच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. माजी आ. भीमराव धोंडे यांनी मांडलेल्या या योजनेमुळे सुमारे ३०० गावांमध्ये पाणीपुरवठा व सिंचन व्यवस्था सक्षम होण्याची शक्यता आहे.

योजना प्रत्यक्षात आल्यास केवळ दुष्काळमुक्तीच नव्हे, तर शेती उत्पादनवाढ, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

कोकणातील अतिरिक्त पाण्याचे पुनर्वाटप; जलसंपदा विभागाकडे प्रस्ताव सादर

मराठवाड्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी कोकणातील समुद्रात वाहून जाणाऱ्या अतिरिक्त पाण्याचे पुनर्वाटप करण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागासमोर ठेवण्यात आला आहे. आष्टी मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य अभियंत्यांना निवेदन देत २० टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या प्रस्तावावर तांत्रिक अभ्यास व व्यवहार्यता तपासणी झाल्यानंतरच पुढील निर्णय अपेक्षित असून, प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### महाराष्ट्र गौरवरत्न पुरस्काराने बीडचे भूमिपुत्र डॉ. महेशकुमार वनवे सन्मानित

बीड । प्रतिनिधी

पुणे येथे नुकतेच आयोजित केलेल्या महाराष्ट्र गौरव रत्न पुरस्कार २०२६ मध्ये कला आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये बहुमूल्य योगदान देणारे आणि मराठी सहित भोजपुरी चित्रपटांचे सुपरस्टार अभिनेते डॉ महेश कुमार यांना सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. मराठीत वामा आणि भोजपुरीत मातृ देवो भव: असे एकाच वेळी दोन भाषांमध्ये दोन सुपरहिट चित्रपट देणारे एकमेव हिरो म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते, डिसेंबरमध्ये उत्तर प्रदेश आणि मार्चमध्ये बिहार सरकारकडूनही त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे.



सत्कार समारंभानंतर पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. महेश कुमार म्हटले की बीड जिल्हा हा कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो, आणि आता या पुरस्काराने त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे,याची कृतज्ञता वाटते. महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेला विनम्र अभिवादन करून हा पुरस्कार माझे सर्व चाहते आणि माझ्या बीड जिल्ह्याला समर्पित करत आहे. डॉ.महेश कुमार वनवे यांना महाराष्ट्र गौरव रत्न पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. संजय तांदळे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# शिदोड नगरीत विठ्ठल नामाचा गजर

## नारळी सप्ताहाचा 'सारासार विचाराने' भक्तिमय प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

मानवाने जीवन जगत असताना सारासार विचार करून भगवंताचे नाम कंठी धरा; कारण नामस्मरणानेच जीवनातील सर्व संकटे नाहीशी होतात आणि हा संसाररूपी भवसागर सहज पार करता येतो,'' असे प्रतिपादन महंत जनार्दन महाराज यांनी बीड तालुक्यातील शिदोड येथील ४७ व्या नारळी सप्ताह निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सेवेप्रसंगी सारासार विचार करून भगवंतांचे नाम कंठी धरा या संत तुकोबारायांच्या अभंगावर कीर्तन सेवेचे पहिले पुष्प गुंफले.

बीड तालुक्यातील ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारसा लाभलेल्या मौजे शिदोड येथे श्री क्षेत्र संस्थान रामगड यांच्या वतीने आयोजित ४७ व्या नारळी अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात मंगल प्रारंभ झाला. गावभर दुमदुमणाऱ्या ''विठ्ठल-विठ्ठल'' नामघोषाने संपूर्ण शिदोड नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली आहे. रविवार दिनांक ५ एप्रिल रोजी सकाळी श्री क्षेत्र रामगड ते शिदोड अशी दोनशे मोटारसायकलची भव्य स्वरुपात रॅली काढण्यात आली. सदर रॅली गावात येतात गावात टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भगव्या पताकांच्या साक्षीने

भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत शिदोडसह परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या शोभायात्रा प्रसंगी गुरू बाबांना रथा मध्ये बसऊन काळ मृदंगाच्या गजरात शिदोड गावातुन मिरवणुक काढत कार्यक्रमस्थळी आणण्यात आले. कार्यक्रम स्थळी येताच पुष्पवृष्टी करून सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. यावेळी संपूर्ण गावात गावात सर्वत्र भक्ती, उत्साह आणि श्रद्धेचे वातावरण निर्माण झाले होते. रात्री कीर्तन सेवेचे पहिले पुष्प महंत जनार्दन महाराज (श्री क्षेत्र मच्छिंद्रगड) 'सारासार विचार करा' कीर्तनातून जीवनमार्गाचा संदेश सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी महंत जनार्दन महाराज (श्री क्षेत्र मच्छिंद्रगड) यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. संत तुकाराम महाराज यांच्या ''सारासार विचार



करा उठाउठी'' या अभंगावर आधारित प्रभावी निरूपण करताना त्यांनी मानवी जीवनातील वेळेचे महत्त्व आणि योग्य विचारांची गरज अधोरेखित केली.

''सार म्हणजे भगवंताचे नाम आणि असार म्हणजे हा क्षणभंगुर संसार,'' असे सांगत त्यांनी अत्यंत सोप्या आणि हृदयस्पर्शी उदाहरणांतून अध्यात्माचा गूढ अर्थ उलगडला. नवनीत आणि ताक यांची उपमा देत त्यांनी सांगितले की, जसे नवनीत सार आहे तसेच भगवंताचे नाम हेच खरे सार आहे.

यावेळी अभंगाचे निरूपण करताना महाराज पुढे म्हणाले की, ''भगवंत नाम चिंतनाने कोणतेही संकट नाहीसे होते. विठ्ठलाचे नाम कंठी धरल्यास भवसागर सहज पार करता येतो. कोणत्याही कुळात जन्म झाला तरी भक्तीने जीवन पवित्र होते आणि कोटी कुळांचा उद्धार होतो.''

कीर्तनावेळी मृदंगाचा नाद आणि टाळांच्या सुरावटीत संपूर्ण शिदोड नगरी विठ्ठलनामात तल्लीन झाली होती.

दिवसभर धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

सप्ताहाच्या परंपरेनुसार दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ८:३० गाथा भजन, ९ ते १२ विष्णुसहस्त्रनाम पठण, दुपारी रामकथा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने असा भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचा संच सुरू आहे. या कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात सातत्याने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

भाविकांची अलोट गर्दी; सेवकांचे अहोरात्र योगदान

सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी शिदोडसह आसपासच्या गावांमधून भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. दर्शन, नामस्मरण आणि कीर्तन श्रवणासाठी भाविकांची अलोट गर्दी उसळली होती. ''विनीत'' म्हणून समस्त गावकरी आणि संस्थानचे सेवक हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. एकूणच, शिदोड नगरीत सुरू झालेला हा नारळी सप्ताह केवळ धार्मिक सोहळा नसून, ''सारासार विचार'' आणि नामस्मरणाच्या माध्यमातून जीवन समृद्ध करण्याचा एक आध्यात्मिक उत्सव ठरत आहे.

## ना पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली युधाजित पंडितांकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदत

गेवराई । प्रतिनिधी

नुकताच गेवराई तालुक्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान केले आहे. संबंधित शेतकऱ्यांची नाजूक आर्थिक परिस्थिती पाहता भाजपच्या नेत्या राज्याच्या पर्यावरण मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांनी भारतीय जनता पार्टी पक्ष स्थापना दिनानिमित्त १० शेतकऱ्यांना प्रत्येकी २१ हजार रुपयाप्रमाणे आर्थिक मदत करून धीर दिला आहे.



गेवराई विधानसभा मतदारसंघामध्ये दिनांक २९ मार्च २०२६ ते ४ एप्रिल २०२६ दरम्यान अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या अवकाळी पावस आणि गारपिटीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे व घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यापैकी काही शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. राज्याच्या पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या आणि माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी पक्ष स्थापना दिनानिमित्त दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती भाजपा युधाजित पंडित यांनी स्वतः गेवराई तालुक्यातील संबंधित अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेऊन राहेरी येथील किशोर लक्ष्मण रायमल, बोरगाव येथील सुखदेव भागोजी घोडे, यांच्यासह १० शेतकऱ्यांना प्रत्येकी २१ हजार रुपयांप्रमाणे २ लाख १० हजार रुपयांची आर्थिक मदत देऊन त्यांना धीर दिला.

याप्रसंगी माझी जि प सदस्य युवराज डोंगरे, शेख रफीक भाई, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, प्रशांत रुईकर, कल्याणराव फलके, प्रल्हाद फलके, रमेशराव फलके, महादेव फलके, दत्ता पाटील फलके, बबनराव फलके, गोपाळसेठ लाड, पुरुषोत्तम लाड, दशरथ लाड, रामेश्वर लाड, परसराम मिंड, रंगनाथ मिंड, एकनाथराव पवार, अंकुशराव खटके, नामदेव खटके, बाळू घोडके, धोंडीराम आलझेंडे, दिलीप घोडे, अभिषेक अलझेंडे, विकास दहिले, दशरथ घोडे, उत्तम कांबळे, रावण गायकवाड, मनोज टाक आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### वडवणी ते साळिंबा झालेल्या

(एजन्सी) यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. व या रोडवरील पडलेले खड्डे तात्काळ दुरुस्ती करावेत. नसता या रोडवरुन ये जा करणारे ग्रामस्थांना सोबत घेवुन राष्ट्रवादी कॉग्रेस च्या वतीने माजलगांव मतदार संघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके साहेब यांच्या आदेशावरुन तिव्र अंदोलन करण्याचा इशारा उपविभागीय अधिकारी सा. बा. वडवणी, मा. आमदार प्रकाशदादा सोळंके साहेब, मा. तहसिलदार साहेब, तहसिल कार्यालय, वडवणी यांना काल दिनांक चार एप्रिल रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत,गौतम बादाडे,आबासाहेब बादाडे,रतन राऊत,लक्ष्मण सावंत,लहु नीर्मळ ,सदाशिव चव्हाण,आबासाहेब आडे,नितीन झोडगे इत्यादींनी दिला आहे

### महात्मा फुले युवा दलाकडून

पालवे दांपत्य गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील मानसिक रुग्णांसाठी कार्यरत आहे. रेल्वे स्थानके, धार्मिक स्थळे किंवा इतर ठिकाणी बेवारस अवस्थेत सोडून दिलेल्या मानसिक रुग्णांना शोधून त्यांच्यापर्यंत वैद्यकीय सेवा, समुपदेशन व उपचार पोहोचवण्याचे कार्य ते करतात. अनेक वेळा अशा रुग्णांची ओळख किंवा कुटुंब उपलब्ध नसते, तरीही त्यांना आधार देण्याचे काम हे दांपत्य सातत्याने करत आहे.याशिवाय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मानसिक रुग्णांची काळजी घेण्यास अडचणी येतात. अशा कुटुंबांना शिधा, समुपदेशन व आवश्यक मदत पुरवून रुग्णांना बेघर होण्यापासून वाचवण्याचा प्रयत्न सेवा संकल्प प्रतिष्ठानमार्फत केला जातो. या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत पालवे दांपत्याची निवड करण्यात आली असून, एप्रिल महिन्यात मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती अॅड. सतीश शिंदे यांनी दिली.

### महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब

गट २ (इयत्ता ९ वी ते १२ वी) विषय - सामाजिक व शैक्षणिक कार्य, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ दुपारी ३ ते ४, खुला गट (पालक, माता, गृहिणी, व्यावसायिक व १९ वर्षांवरील) विषय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांचे राष्ट्र उभारणीत योगदान, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ सायंकाळी ६ ते ७, महिलांसाठी विशेष स्पर्धा ठेवण्यात आल्या आहेत. ज्यात रांगोळी स्पर्धा, विषय - महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचे रांगोळी रूपात सादरीकरण, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वेळ सकाळी ८ ते ९ वाजता. सदरील स्पर्धेचे वैशिष्ट्ये - समाजप्रबोधनाचा संदेश, सर्जनशीलतेला प्रोत्साहन, सर्व वयोगटांसाठी संधी उपलब्ध करून देणे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. विजेत्यांस सन्मानचिन्ह व तसेच आकर्षक बक्षिसे देण्यात येतील. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी संपर्क - ९८५०१८९२३७ / ८२७५४८६६४३ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, सचिव रत्नादीप गोरे, उपाध्यक्ष अनिल नरसिंगे, कोषाध्यक्ष संजय साळवे, सुनील नरसिंगे, हेमंत धानोरकर, प्रा.आदित्य कदम, विजय कचरे, रामेश्वर खाडे, भाऊराव गवळी यांनी केले आहे.

### सेवानिवृत्त ग्रामसेवकाने केले

शासकीय कामासाठी अथवा इतर प्रशासकीय कामासाठी अडचणी निर्माण होत आहेत.तरी सेवानिवृत्त ग्रामसेवक खाडप यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की मी सेवानिवृत्त झालो आहे त्यामुळे चार्ज घ्यायचा सोडायचा विषयच नाही आणि मी कार्यालयातुन अभिलेखे गायब केले नाहीत ज्यांनी कोणी केले असेल त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी असे त्यांनी सांगितले आहे.मग अभिलेखे कोणी गायब केले हो मोठा प्रश्न आहे.

### अॅड. तेजस नेहरकर यांच्या

वतीने जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि तपासातील तांत्रिक बाबींचा विचार करून, माननीय न्यायालयाने आरोपीचा जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने अॅड. तेजस नेहरकर यांनी प्रबळ कायदेशीर बाजू मांडली. त्यांना या कामी अॅड. जाधव, अॅड. सिकंदर, अॅड. दत्ता केसकर आणि अॅड. रविराज राठोड यांनी सहकार्य केले. बचाव पक्षाने मांडलेले मुद्दे आणि पुराव्यांची स्थिती विचारात घेऊन न्यायालयाने हा जामीन आदेश निर्गमित केला आहे.

### रामरक्षा स्तोत्र पठण

पुणे येथून ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यभरातून अनेक स्पर्धक सहभागी झाले होते. शुद्ध उच्चार, स्पष्टता आणि पाठांतर या निकषांवर समर्थने आपली छाप पाडत द्वितीय स्थान मिळवले. समर्थच्या या यशाचे कौतुक करण्यासाठी पात्रुड येथे एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना वेदमूर्ती कृष्णा देवा जोशी म्हणाले की, ''आजच्या धावपळीच्या युगात तरुण पिढीने आपल्या संस्कृत संस्कृतीचा आणि स्तोत्र पठणाचा वारसा जपणे ही कौतुकास्पद बाब आहे. समर्थसारख्या बालकांनी केलेले हे पाठांतर इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल.यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, भजनी मंडळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. समर्थच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्याच्या या यशाचे श्रेय त्याने आपले गुरु आणि पालकांच्या मार्गदर्शनाला दिले आहे.

------------

## वंचित आघाडीच्या वतीने तहसील कार्यालयावर धरणे आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी, माजलगाव तालुक्याच्या वतीने केंद्र सरकारविरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. वाढत्या गॅस सिलेंडर दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांना भेडसावत असलेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन दि ०६ एप्रिल सोमवार रोजी करण्यात आले.तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.




वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष अशोक पौळ यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गॅस सिलेंडरच्या किमतीत झालेली प्रचंड वाढ ही गरीब, मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मोठा आर्थिक भार ठरत आहे. महिलांना, ग्रामीण भागातील कुटुंबांना आणि कामगार वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत असून स्वयंपाकासाठी आवश्यक असलेला गॅस परवडेनासा झाला आहे. निवेदनानुसार, देशात सध्या सिलेंडर दर ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचले असून अनेक ठिकाणी काळाबाजार व साठेबाजीच्या तक्रारीही वाढत आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर 'नरेंद्र कब मिलेगा सिलेंडर' अशी घोषणा देत निषेध आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारने तातडीने गॅस दर कमी करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, यावेळी धम्मानंद भाऊ सळवे, अंकुशराव जाधव, भारत तांगडे, सचिन उजगरे , शत्रुघ्न कसबे, रामेश्वर उदमले, सर्जेराव शिंदे, किशोर कांबळे, महादेव पौळ, भानुदास साळवे, सिद्धार्थ पौळ,विष्णू शेरकर, उमाकांत खोपे,विजय साळवे,धम्मानंद साळवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## आष्टी तालुक्यातील गॅस एजन्सीकडुन सामान्य ग्राहकाची लूट

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील शहर भागातील अनेक दिवसापासून गॅसचा तुटवडा यात काही गॅस एजन्सी कडुन सामान्य माणसाला ग्राहकांची आर्थिक होत असल्याचे समोर येत आहे पिळवणूक करण्याच्या लायसन रद्द करण्यात यावा अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष रमेश गावडे यांनी केली आहे.



आष्टी तहसीलदार वैशाली पाटील यांना निवेदन देऊन गॅस लायसन रद्द करण्यात यावा नसता जन आंदोलन करण्यात येईल अशा इशारा दिला आहे आष्टी तालुक्यातील गॅस एजन्सी कडुन काळाबाजार सुरू केलाय आहे एजन्सी दरदिवशी गॅास टाकी २५० येतं आहे १५० टाकी ब्लॅकनी देत आहेत ऑनलाईन रेट ९६०आहे काळाबाजार करुन २००० ब्लॅकनी टाकी देत आहेत शेतकरी महिला वर्ग गॅस मुळे त्रस्त झाले आहेत आष्टी तालुक्यातील गॅस सिलेंडर अहिल्या नगर रातरात्री ब्लॅकमेल विक्री होत आहे घरगुती कमर्शियल चा टोनी तात्याचा काळाबाजार वाढला आहे याची प्रसानानी कठोर कायदेशीर कारवाई करावी नसता जन आंदोलन करण्यात येईल असे भाजप तालुका अध्यक्ष रमेश गावडे यांनी केले आहे जर आष्टी तालुक्यांतील गॅस एजन्सी कडुन दाम दुप्पट देऊन आर्थिक झाल्यास संपर्क असे जनतेला आव्हान केले आहे मोबाईल नंबर ८३९०८०२६६६ या कामावर साधण्याचा प्रयत्न करावा यावेळी निवेदन देतानानी भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, बाजार समितीचे सभापती रमाजान तांबोळी सोशल फॉर्म चे अध्यक्ष यशवंत खंडागळे,सुनिल नाथ जयश्री जाधव आदि उपस्थित होते.

## परीक्षांच्या काळात पटपडताळणीचा अट्टाहास कशासाठी ?

### महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचा शिक्षणमंत्र्यांना सवाल; पटपडताळणीचा निर्णय रद्द करा-खंडेराव जगदाळे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शाळांमध्ये सध्या वार्षिक परीक्षांचे वातावरण असून इयत्ता ९ वी, ११ वी आणि पायाभूत चाचण्यांचे नियोजन सुरू आहे. अशा अत्यंत व्यस्त काळात शिक्षण विभागाने प्रत्यक्ष पटपडताळणीचे आदेश दिल्याने शिक्षक आणि मुख्याध्यापकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हा अघोरी निर्णय रद्द करावा किंवा पुढे ढलावा, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने शिक्षण मंत्री ना. श्री. दादाजी भुसे यांच्याकडे केली आहे.



समितीचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी या संदर्भात शिक्षण मंत्री आणि शिक्षण संचालकांना लेखी निवेदन पाठवून वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे.

शासनाने ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी परीक्षांचे आयोजन केले आहे. याच काळात ९ वी आणि ११ वी च्या महत्त्वाच्या विषयांच्या परीक्षाही आहेत. अशा वेळी प्रत्यक्ष पटपडताळणी लादल्याने परीक्षेच्या कामात मोठी अडचण निर्माण होणार आहे.

एका बाजूला विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि दुसऱ्या बाजूला प्रशासकीय पडताळणी, अशा दुहेरी कत्रीत शिक्षक अडकले आहेत. यामुळे त्यांच्यावर विनाकारण मानसिक ताण येत असल्याची भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. दुसरीकडे

शासनाने आधीच ऑनलाइन संचमान्यता ग्राह्य धरून पदे निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. जेव्हा ऑनलाइनचा पारदर्शक पर्याय उपलब्ध आहे, तेव्हा पुन्हा प्रत्यक्ष पडताळणी करून वेळ आणि मनुष्यबळ वाया का घालवले जात आहे? असा सवाल ही विना अनुदानित शाळा कृती समितीने केला आहे.

समितीच्या प्रमुख मागण्या:

१. सद्यस्थितीतील परीक्षांचा विचार करून प्रत्यक्ष पटपडताळणीचा आदेश तात्काळ रद्द करावा. २. ही प्रक्रिया पुढे ढकलून ती पुढील शैक्षणिक वर्षात ३० सप्टेंबरच्या पटसंख्येवर आधारित घेण्यात यावी. ३. वारंवार बदलणारे आदेश न काढता, शिक्षण विभागाने निश्चित अशी एकच पडताळणी प्रक्रिया ठेवावी. या निवेदनावर समितीचे अध्यक्ष एस. यू. म्हासकर, कार्याध्यक्ष आर. झेड. बावीसकर, राज्य संघटक पुंडलिक रहाटे, वैजिनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, विजयसिंह शिंदे, मुक्ता मोटे मॅडम आणि बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्षांचे समर्थन आहे. आता शासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार कार्यालय बीड (संकीर्ण विभाग)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार बीड यांचे न्यायालयात**
**सुनावणी नोटीस**

**क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंद/कावी-४४१**
**दिनांक ६/४/२०२६**

**विषय : जन्म नोंद प्रस्ताव दाखल केल्याबाबत.**
**श्री.अशोक देविदास बागलाने**

संदर्भ : भारत राजपत्र सी.जी.डी.एल.अ.(१२०८२०२३-२४८०४४ नवी दिल्ली शुक्रवार ऑगस्ट ११, २०२३ परिपत्रक व व्याप्ती निर्देशान्वये या न्यायालयात प्रकरण चालविण्याचा अधिकार आहे. २ ) मा.जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश क्र.२०२३/आरबी-डेस्क-१/पोल-१/जन्म-मृत्यू नोंदणी कायदा २०२३ दिनांक १३.१०.२०२३

उपरोक्त विषयी या न्यायालयात श्री/श्रीम.अधिवक्ता/अॅड. यांनी वकीलपत्रासह अर्जदार श्री.अशोक देविदास बागलाने रा.काकडहिरा ता.बीड यांचे वतीने विषयासंदर्भात प्रस्ताव दाखल केला आहे.

याद्वारे थोडक्यात असे की श्री.अशोक देविदास बागलाने यांची आपले कार्यालयाचे दप्तरी जन्म नोंद नोंदवहीप्रमाणे अनुपलब्ध असलेबाबत आपले कार्यालयातून दिनांक १६/०२/२०२६ रोजी प्रमाणपत्र दिले आहे.

त्याअनुषंगाने आपलेमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करून सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी श्री.अशोक देविदास बागलाने यांचे दिनांक ०९/१०/१९८७ रोजीची जन्म नोंद नोंदवहीमध्ये घेण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद दिनांक ०९/१०/१९८७ घेण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

सदरील नोटीस आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवून पंचनामा प्रत या कार्यालयात सादर करावा.

आज दिनांक ६/४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख ६/५/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार, बीड**

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.८ एप्रिल २०२६


# युद्धाच्या नावाखाली केळी उत्पादक शेतकऱ्यांची लूट ?

## जाणीवपूर्वक पाडले जात आहेत केळीचे दर

जळगाव / प्रतिनिधी

सध्या येथील शेतकरी अस्मानी संकटापेक्षा सुलतानी जाचाने अधिक होरपळला जात आहे. अमेरिका, इराण आणि इस्रायलमधील युद्धाचे निमित्त पुढे करून व्यापाऱ्यांनी एक मोठी साखळी (रिंग) तयार केली आहे. केळीचे भाव जाणीवपूर्वक पाडले आहेत. दोन रुपयांपासून ते पाच रुपयांपर्यंत केळी खरेदी करून शेतकऱ्यांची उघड लूट केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

राज्यात निर्यातक्षम दर्जाची केळी उत्पादित होते. मात्र आजच्या स्थितीत ए ग्रेड मालालाही व्यापारी भडकलेल्या आखातात युद्धामुळे भाव देण्यास तयार नाहीत अशी विचित्र स्थिती आहे. यामुळे केळी उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त बनला आहे. उत्तम दर्जाच्या मालाला कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त



होत आहे. बाजारात केळी चाळीस रुपये डझन या भावाने ग्राहकांना विक्री केली जात आहे. प्रत्यक्षात मात्र व्यापारी आखातात सुरू असलेल्या युद्धाच्या नावाखाली शेतकऱ्याकडून दीड ते दोन रुपये किलो दराने खरेदी करत आहेत.

खरेदी केलेला निर्यातक्षम केळी पुणे, मुंबई, ठाणे यासह परप्रांतातील मोठ्या शहरात तेथील ठोक विक्रेत्यांना चढ्या दराने विक्री करून व्यापारी नफा कमवत आहेत. इकडे मात्र शेतकऱ्यांना कवडीमोल दर देत आहेत.

युद्ध तिकडे सुरू आहे आणि त्याचे चटके इथल्या शेतकऱ्यांना दिले जात आहेत. हे केवळ व्यापाऱ्यांचे षडयंत्र आहे. शेतकऱ्यांच्या केळीचे भाव पाडून त्यांची लूट केली जात आहे. जर शासनाने वेळीच दखल घेतली नाही आणि व्यापाऱ्यावर कारवाई केली नाही तर शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही.

# शेळ्यांमधील खूरसडा आजार: कारणे आणि उपाययोजना



शेळीपालन हा एक फायदेशीर व्यवसाय आहे. शेळी पालन व्यवसाय करण्यासाठी कमीत कमी जागा व खर्चही कमीत कमी लागतो. कमी खर्चात जास्त मिळवून देणारा हा व्यवसाय आहे. शेळीला गरीबाची गाय म्हटले जाते. शेळ्यांना लागणारे खाद्य त्यांचा निवारा व प्रजननाचे व्यवस्थापन या गोष्टीवर लक्ष दिले तर तोटा जास्त करून येत नाही. या शिवाय शेळ्यांमध्ये होणारे सर्व सामान्य आजार याबाबतही जागरूक राहणे फार गरजेचे आहे. पावसाळयातध्ये शेळयांना सहजासहजी खूरसडा आजार होतो.

शेळ्यांमधील खूरसडा आजार : खूरसडा आजार हा जिवाणूमुळे होतो. शेळ्यांच्या पायांच्या दोन खुरामध्ये असलेल्या जागेवर जंतूसंसर्ग होतो. यामध्ये सुरुवातीला सूज येते व हळूहळू तो भाग सडायला सुरुवात होते व शेवटी खूर निकामी होते.

या आजाराचे लक्षणे : आजार झाल्यावर शेळ्या लंगडत चालतात आणि जाग्यावर उभे असतील तर ज्या पायाच्या खुराला सूज आहे तो पाय वर उचलून धरतात. तसेच या आजारात शेळ्यांचे वजन झपाट्याने कमी व्हायला लागते.

आजारावर करायचे उपाय : ज्या शेळ्या पावसाळ्यात चरायला जातात त्यांच्यासाठी फुटवॉशचा वापर करावा. फुटवॉशसाठी पोटॅशियम परमॅग्नेट वझिंक सल्फेट च्या द्रवणाचा वापर करावा. तसेच शेडच्या प्रवेशद्वाराजवळ दोन टक्के फॉर्मालीन द्रावण वापरावे. या आजाराची लक्षणे असो किंवा नसो तरी वरील उपाययोजना करणे आवश्यक आहे. ज्या शेळ्यांमध्ये या आजाराची लक्षणे दिसतात, अशा शेळ्यांना बाहेर चरायला सोडू नये. अशा शेळ्यांना पाणी आणि खाद्य जागेवर द्यावे. कारण चरायला बाहेर गेल्यानंतर खुराला अधिक जखम होण्याची दाट शक्यता असते. आजार झाल्यास पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत. यातून बरे झालेल्या शेळ्यांना लगेच चरायला न सोडता तीन ते चार दिवस शेडमध्ये चारापाणी द्यावे. आजार झालेला असल्यास खूरकाचे प्रमाण जास्त वाढविल्यास शेळ्या लवकर बऱ्या होतात.या आजारावरील प्रतिबंधात्मक उपाय : शेळ्यांचे खूर जास्त वाढलेली असतील तर ते वेळोवेळी कापून काढावे. खुराच्या वरच्या बाजून केस जास्त वाढलेले असतील तर ते कापून काढावीत कारण यामध्ये घाण जमा होऊन नंतर त्याला संसर्ग होतो. खुराच्या मध्ये सूज आलेली आढळल्यास त्यावर माशा बसू नयेत किंवा होऊ नयेत यासाठी योग्य स्प्रे मारावा. उपचार करायच्या आगोदर पशु वैद्यकाचा सल्ला नक्की घ्यावा.

# जनावरांचे आजार ओळखण्यासाठी बाह्य निरीक्षण महत्वाचे

भारतामध्ये शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसाय केला जातो. परंतु कोणत्याही व्यवसायाप्रमाणे पशुपालन व्यवसायामध्ये देखील समस्या असतातच. गाय आणि म्हशी सारख्या जनावरांना होणारे आजार एक प्रमुख समस्या असते. परंतु जनावरांचे बारकाईने निरीक्षण केल्यास या निरीक्षणावरून जनावरांना कोणत्या प्रकारचा आजार झाला आहे याचा ढोबळ मानाने अंदाज बांधता येतो व या पद्धतीने उपचार देखील करता येतात व होणाऱ्या नुकसानीपासून वाचता येते.

बाह्य निरीक्षणातून ओळखा आजार :जनावरांची कासेचे निरीक्षण करताना ती सर्वसाधारण आहे का? कासेवर सूज आलेली आहे का? याचे निरीक्षण करावे जेणेकरून कासदाह यावर तात्काळ उपचार करणे शक्य होते. तसेच कासेच्या कमी होणाऱ्या आकाराकडेही लक्ष ठेवावे. जेणेकरून कोणत्यातरी घटकाची कमतरता असल्यामुळे किंवा कासेचा आजार लक्षात येऊन दूध उत्पादनात होणारी घट राहता येते. जनावरांच्या शेपटीचे निरीक्षण करताना शेपटी वरचे केस कमी होत आहेतका? किंवा शेपटीच्या गोंड्याचे पूर्ण केस गेले आहेत का? याचे व्यवस्थित निरीक्षण करावे. यावरून शेपटीला जंतुसंसर्ग, सरड्या या रोगाचे योग्य



निदान करून उपचार करणे शक्य होते. जनावरांचे निरीक्षण करताना जनावरांच्या शरीरावर कुठे सूज आहे का? उदाहरणार्थ पुढच्या दोन्ही पायांच्या मध्ये, जबड्याच्या इत्यादी ठिकाणी पहावे .यावरून दोन्ही पायांच्या मध्ये सूज असल्यास पोटात गेलेली अखाद्य वस्तू, जबडे खाली सूज वरून घटसर्प,जंत प्रादुर्भाव याचे निदान करता येते. दोन्ही डोळ्यांचे निरीक्षण करताना डोळे पाणीदार, टवटवीत आहेत का? डोळ्यातून स्त्राव किंवा घाण येत आहे का? याची व्यवस्थित निरीक्षण करावे. तसेच डोळे पांढरे, निळे झाले आहेत का? त्याचे व्यवस्थित निरीक्षण करावे. या निरीक्षणावरून डोळ्याला लागलेला मार लक्षात येऊन वेळीच उपचार होतात. बऱ्याच वेळा इतर आजारांमुळे देखील जनावरांच्या डोळ्यातून पाणी येताना दिसते. तसेच जनावरांच्या नाकपुडीचे निरीक्षण करताना नाकपुडी जर कोरडी असेल तर जनावर आजारी आहे हे समजावे. नाकपुडी जर पाणीदार असेल तर जनावरे निरोगी असल्याचे दर्शवते. जनावरांच्या तोंडामधून सतत लाळ गळत असेल तर जनावरांच्या तोंडामध्ये जखम किंवा लाळ खुरकूत रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे हे समजावे. तसेच इतर लक्षणांची सांगड घालून त्याचे योग्य निदान होऊ शकते. बऱ्याच गाई किंवा म्हशी जर शिंगे गोठ्यामध्ये गव्हाणी, भिंतीवर आदळतात. यावरून एक तर कानाच्या मधल्या भागाला सूज येऊन कानात पू तयार झाला आहे किंवा शिंगांचा कॅन्सरही असण्याची शक्यता असते. काही जनावरे सतत दात खाताना त्यांचा आवाज येतो किंवा कण्हण्याचा आवाज येतो. तेव्हा अशा जनावरांमध्ये एकतर पोटशूळ किंवा इतर आजार असण्याची शक्यता असते. म्हशीच्या अंगावर कधीकधी काळ्या कातडीवर पांढरे ठिपके दिसतात. कालांतराने या ठिपक्यांचा आकार हळूहळू वाढत जातो. अशा वेळी समजावे की कॉपर च्या कमतरतेमुळे हे पांढरे ठिपके दिसून येत आहेत. अशावेळी पशुतज्ज्ञांकडून वेळेस उपचार करून घ्यावे.

# रब्बी पिके काढणीनंतर नांगरट महत्वाची

शाश्वत पीक उत्पादन वाढीसाठी जमिनीची मशागत योग्य वेळी करणे महत्वाचे आहे. जमिनीचे भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म सुधारून पिकांच्या वाढीसाठी, जमिनीमध्ये पोषक परिस्थिती निर्माण करण्यासाठी मशागतीमध्ये नांगरटीस अनन्य साधारण महत्व आहे. रब्बी हंगामातील पिके काढणीनंतर मशागतीची कामे त्वरित करणे पीक लागवडीच्या दृष्टीने फार आवश्यक आणि महत्वाचे समजले जाते म्हणूनच म्हटले आहे की, ''मशागत काय खताला ऐकते?'' म्हणून जमिनीची मशागत योग्य वेळी व योग्य पद्धतीने केल्यास आपल्याला त्यांची सत्यता पटेल.

कोरडवाहू क्षेत्रावर ज्वारी, करडई, सुर्यफुल आणि हरभरा यांची लागवड होते. पैकी सुर्यफुल आणि हरभरा या पिकांची काढणी बहुतांश भागात जानेवारी महिन्यातच उरकरलेली आहेत. तर ज्वारी आणि करडईची काढणी सर्वसाधारणपणे या फेब्रुवारी-मार्च महिन्यात होत असते. जमिनीची नांगरट ही पिके निघताच जमिनीत ओल असेपर्यंत पूर्ण करावी म्हणजे हे काम कमी कष्टाचे व जलद होते. नांगरटीची कामे नेहमी उताराला आडवी करावीत. जेणेकरून पावसाळी हंगामाच्या सुरवातीला पडणारे पावसाचे पाणी या नांगरटीत पूर्ण मुरेल आणि वाहून जाणाऱ्या पाण्याबरोबर होणारी जमिनीची धूपही थांबेल.

नांगरणीची वेळ : पिकाची काढणी करतो, त्यावेळी जमिन थोडीफार ओलसर असते अशावेळी शेत नांगरणीच्या कामास प्राधान्य दिले पाहिजे.



पिकाची काढणी झाल्यानंतर जमिन उघडी होते. त्यामुळे जमिनीत काही प्रमाणात असणारी ओल कमी कमी होत जाते. तस तशी जमिन कडक बनत जाऊन जमिन नांगरणीस अवघड व अयोग्य बनतात. जमिनीची नांगरट पीक काढणीनंतर लगेच थोडी फार ओल असताना केल्यास नांगर शेतात एकसारखा चांगला लागतो. कमी खर्चात, कमी ताकदीत चांगली नांगरट होते. शेतात मोठया प्रमाणावर ढेकळे निघत नाहीत. त्यामुळे पुढील मशागतीची कामे चांगल्या प्रकारे करता येतात.

जमिन पिकाच्या वाढीसाठी चांगल्या स्थितीत आणता येते.

अवर्षणप्रवण जमिनीसाठी मशागत महत्वाची :ोरडवाहू शेतीमध्ये प्रामुख्याने अवर्षणप्रवण विभागातील जमिनीसाठी मशागत अधिक महत्वाची असते कारण या भागातील जमिनीत चिकण मातीचे प्रमाण अधिक असल्याने पावसाचे पाणी झिरपण्याचा वेग कमी असतो. तसेच पावसाची तीव्रताही जास्त असते. अशा परिस्थितीत पावसाचे पाणी जमिनीत मुरायला वाव मिळाला नाही तर ते पाणी वाहून जाण्याचे प्रमाण वाढते. त्याबरोबर मातीची धूपही मोठया प्रमाणात होते म्हणून या जमिनी मशागतीद्वारे चांगल्या भुसभुशीत करण्याची गरज असते.

पिकांच्या गरजेनुसार ही मशागत करणे आवश्यक : पूर्वमशागतीच्या कामांचा विचार वाढत्या मजूरीशी सांगड घालूनच केला पाहिजे या दृष्टीने जास्त खर्चाची व श्रमशक्ती लागणारी नांगरटीसाठी मशागतीची कामे दरवर्षी आपण केलीच पाहिजेत असे नाही. आपल्या जमिनीच्या आणि आपण घेणाऱ्या पिकांच्या गरजेनुसार ही मशागत करणे आवश्यक आहे. जेव्हा पाऊसकाळ सर्वसाधारण असतो तेव्हा रब्बी हंगामातील पेरणीपूर्वी जमिनीच्या ओलीची स्थिती आपण पहिली तर असे दिसते की, कमी अधिक मशागत केलेल्या खोलीच्या सर्व जमिनीत पुरेशी ओल झालेली असते. अशा जमिनीच्या खोलीची मर्यादा ठरलेली असल्याने साधारणतः ९० से.मी. पर्यंत ओल, रब्बीतील महत्वाच्या पिके उदा. ज्वारी, करडई, हरभरा या पिकांच्या वाढीसाठी पुरेशी पडते. या जमिनीसाठी दरवर्षी नांगरटची गरज असते. हरळी, कुंदा, लव्हाळ्या यासारख्या खोलमुळे असलेल्या तणांचा उपद्रव नसेल त्या ठिकाणी दर तीन वर्षांनी एकदा खोल नांगरट करावी. नांगरटीची गरज ही त्या जमिनीत घेतलेले आधीचे पिक कोणते होते त्यावरही ठरते. तूर, सुर्यफुल, यासारख्या पिकांच्या मुळ्या, धसकटे जमिनीत खोलवर गेल्याने कुळूवाच्या पाळीने निघणे सहसा होत नाही, अशा ठिकाणी नांगरट ही अत्यावश्यक ठरते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: 'जागतिक कोंकणी भाषा दिन'

### महत्वाच्या घटना

१६६९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपल्या सैनिकांना हिंदुची सर्व धार्मिक स्थळे, मंदिर, शाळा उध्वस्त करण्यास सांगितले.

१८६० : फ्रेंच देशातील प्रकाशक, पुस्तक विक्रेता आणि शोधक एडुअर्ड-लिओन स्कॉट डी मार्टिनविले यांनी सर्वप्रथम मानवी आवाजाचे ध्वनीमुद्रण केलं.

१८६७ : रशियाकडून अलास्का हा प्रांत खरेदी करण्याच्या प्रस्तावास अमेरिकेत 'एक' मताने मंजुरी मिळाली.

१९४० : दुसरे महायुद्ध : जर्मनीने नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत केले.

१९५३ : वॉर्नर बंधूंचा पहिला त्रिमितीय (३ ) चित्रपट, हाऊस ऑफ वॅक्स, प्रदर्शित झाला.

१९६७ : बोइंग-७६७ ने पहिले उड्डाण केले.

१९९४ : सूक्ष्मजीवशास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल शास्त्रज्ञ पी. एम. भार्गव यांना 'आर. डी. बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान

१९९५ : लता मंगेशकर यांना उत्तर प्रदेशचे राज्यपाल मोतीलाल व्होरा यांच्या हस्ते 'अवधरत्न' व साहू सूरसम्मान' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

२००३ : इराक देशातील लोकांना सद्दाम हुसेन यांच्या तानशाही पासून मुक्ती मिळाली.

२००५ : प्रिन्स चार्ल्सचा कॅमिला पार्कर-बोल्सशी विवाह संपन्न.

२०११ : प्रख्यात भारतीय समाजसेवक अण्णा हजारे दिल्ली येथे लोकपाल बील कायदा पास करण्यासठी करीत असलेले आमरण उपोषण सरकारने आपली मागणी मान्य केल्यानंतर बंद केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३६ : तैमूरलंग मंगोल सरदार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १४०५)

१७७० : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ थॉमस योहान सीबेक यांचा जन्म.

१८२८ : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (मृत्यू: २५ जुलै १८८०)

१८८७ : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ आक्टोबर १९५०)

१८९३ : राहूल सांकृतायन इतिहासकार (मृत्यू: १४ एप्रिल १९६३)

१९२५ : लिंडा गुडमन अमेरिकन ज्योतिषी व लेखिका (मृत्यू: २१ आक्टोबर १९९५)

१९२९ : भारतीय पद्मभूषण, पद्मश्री, संगीत-नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित शरण राणी यांचा जन्मदिन.

१९३० : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ एफ. अल्बर्ट कॉटन यांचा जन्म. १९४८: जया भादुरी अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

५८५ : ५८५ इ.स. पूर्व : जपानचा पहिला सम्राट सम्राट जिम्मू यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी इ. स. पूर्व ७११)

१६२६ : सर फ्रँन्सिस बेकन इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी (जन्म: २२ जानेवारी १५६१)

१६९५ : वैशाख शु. ६ शके १६१७ पंडितकवी वामनपंडित यांनी भोगाव येथे समाधी घेतली. भर्तृहरीच्या शतकत्रयीचा अनुवाद आणि यथार्थदीपिका ही गीतेवरील टीका हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (जन्म: ? ? १६०७)

१९०१ : भारतीय रहस्यवादी, तत्वज्ञ, विद्वान, सुधारक व जैन कवी श्रीमद श्रीरामचंद्र यांनी समाधी घेतली.

१९५२ : प्रख्यात काश्मीर खोऱ्यातील कवी महजूर यांचे निधन.

१९८१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी दुर्गाबाई देशमुख यांचे निधन.

१९९४ : चंद्र राजेश्वर राव स्वातंत्र्यसैनिक, तेलंगणाच्या लढ्याचे प्रवर्तक, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (जन्म: १९१४)

१९९८ : डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: २२ जून १९०८)

२००१ : बेहराम कॉन्ट्रॅक्टर ऊर्फ 'बिझी बी' पत्रकार व स्तंभलेखक, 'आफ्टरनून डिस्पॅच अँड कुरियर' या सायंदैनिकाचे संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३०)

२००१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: ११ जुलै १९२१)

२००९ : शक्ती सामंत हिन्दी व बंगाली चित्रपट दिग्दर्शक व निर्माते (जन्म: १३ जानेवारी १९२६)

२००९ : अशोकजी परांजपे गीतकार (जन्म:)

# शेतातून बिबट्याला पळवून लावण्याचा देशी जुगाड

आजकाल सर्वत्र शेतातील बिबट्यांचा वावर मनुष्याला मोठा धोका निर्माण करत आहे. ही परिस्थिती फक्त महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात बिबट्यांमुळे शेतकरी संकटात सापडला आहे. आता याच पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील पिलीभीत जिल्ह्यातून शेतातून बिबट्याला पळवून लावण्याचा देशी जुगाड केला आहे. या जुगाड तुमच्याही नक्कीच उपयोगाला येऊ शकतो .

उसाचे शेत हे दाट असतात आणि दृश्यमानता कमी असते, उसात काय आहे ते लांबून दिसत नाही. अशावेळी शेतात चालत असताना अचानक बिबट्याचे दर्शन झालं तर चांगलाच थरकाप उडतो. अशावेळी बिबट्या शेतातून पळून जावा यासाठी ऊसतोड कामगारांनी सौरऊर्जेवर चालणाऱ्या ध्वनी प्रणालीवर मोठ्या आवाजात संगीत वाजवण्याचा उपाय अमलात आणलेला आहे. शेतकऱ्यांच्या मते, ध्वनी प्रणालीतून सतत येणाऱ्या आवाजामुळे वन्य प्राण्यांना शेतात प्रवेश करण्यापासून रोखण्यास मदत करते. तसेच ऊस तोडत असताना गाणी ऐकल्याने कामगारांचेही मनोरंजन होते. म्हणजेच काय तर या देशी जुगाडाचा दुहेरी फायदा होताना दिसत आहे. ही पद्धत मानव-प्राणी संघर्ष रोखण्यासाठी एक अनोखी पद्धत म्हणून उदयास आली आहे. महाराष्ट्रातही लोकवस्तीवर आणि शेतात बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. बिबट्याने अनेकांचा जीव घेतल्याच्या घटना दररोज पाहायला मिळत आहेत. अनेकदा तर रात्रीच्या अंधारात बिबट्या इकडे तिकडे फटकताना दिसतो आहे. पश्चिम महाराष्ट्रात आणि कोकणात तर बिबट्याची मोठी दहशत आहे. नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये बिबट्यांची संख्या वाढत आहे. अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांत हल्ल्यांमध्ये अनेकांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

cmyk



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

बुधवार दि.८ एप्रिल २०२६





# आपण कोणाला दोष द्यायचा नाही आणि कोणाचा द्वेष करायचा नाही, नियती सगळे काही नीट करते - धनंजय मुंडे

## भगवानगडाची ऐश्वर्यसंपन्नता महंत डॉ. नामदेव शास्त्रींनी अबाधित राखली मुंडेंचे बडेवाडी येथील नारळी सप्ताहात विधान

पाथर्डी प्रतिनिधी

कोणी आपल्याला दोष देवो किंवा आपलं द्वेष करो, आपण मात्र कोणाला दोष द्यायचा नाही किंवा कुणाचा द्वेष करायचा नाही. नियती सर्वांचा हिशोब नीट करत असते असे वक्तव्य माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाच्यावतीने पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे आयोजित अखंड नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात धनंजय मुंडे बोलत होते.

भक्ती, शक्ती आणि विश्वासाची भगवानगडाची परंपरा आहे. लाखो ऊसतोड कामगार आपल्या एक रुपया कमाईतील वीस पैसे देणगी भगवानगडाला देतात आणि त्यातूनच या गडाची महती आज देश विदेशात पोहोचली आहे. ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबांनी भगवानगडाची गादी ही ऐश्वर्या संपन्न बनवली. ऐश्वर्या संपन्नतेची ती परंपरा आभाधीत राखण्याचे काम आज गडाचे महंत न्यायाचार्य हभप डॉ. नामदेव शास्त्री यांच्यामार्फत केले जात असल्याचे विधानही यावेळी धनंजय मुंडे यांनी केले. भगवानगड हे आपले ऊर्जा स्थान असून, भगवानगडाच्या सावलीत आपल्याला नेहमी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी व्यासपीठावर महंत डॉ. नामदेव शास्त्री, गडाचे उत्तराधिकारी हभप कृष्णा महाराज शास्त्री, आईसाहेब संस्थानच्या हभप राधाताई सानप, खा. निलेश लंके, आ. मोनिकाताई राजळे, माजी आ. बाळासाहेब आजबे, ॲड. प्रताप ढाकणे, ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांसह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आधी बडेवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी धनंजय मुंडे यांची जंगी मिरवणूक काढत फुलांची उधळण करत जोरदार स्वागत केले.





**उमापूर येथे नारायणगडाच्या सप्ताहासही दिली भेट, महंत शिवाजी महाराजांचे घेतले आशीर्वाद**

दरम्यान बडेवाडी येथे जाण्याअगोदर धनंजय मुंडे यांनी गेवराई तालुक्यातील उमापूर येथे श्री क्षेत्र नारायणगडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थिती लावली. यावेळी गडाचे महंत हभप शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी ग्रामस्थानी धनंजय मुंडे यांचे स्वागत केले, यावेळी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हेही उपस्थित होते.

# स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारं हक्काचं व्यासपीठ

परतुर । प्रतिनिधी

वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय प्रसंग आणि त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारी पर्वणी आहे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न घेता जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी अष्टपैलू होणे गरजेचे आहे. वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारं एक हक्काचं व्यासपीठ आहे असे प्रतिपादन शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष अशोक साबळे यांनी केले.परतूर तालुक्यातील पिंप्रुळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाले यात्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष अशोक साबळे उपाध्यक्ष दीपक कदम सदस्य गोरख गाडगे पाटील,सरपंच कैलास इंगळे गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मैनोद्दीन सय्यद शिक्षक नितीन माने यांची उपस्थिती होती.



आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांची रंगीबेरंगी वेशभूषा, तालबद्ध नृत्य आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे शाळेचा संपूर्ण परिसर उत्साहाने आणि जल्लोषाने भारावून गेला होता.विद्यार्थ्यांनी विविध नृत्याविष्कार,समूह नृत्य, देशभक्तीपर नृत्य तसेच लोकनृत्य,भारुड, पोवाडा, विनोदी बातम्या, नाटिका अभिनयातून विद्यार्थ्यांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला देखील उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत भरभरून दाद देत विद्यार्थी प्रोत्साहनपर आपला खिसा रिकामा करीत हजारो रुपयांची बक्षीस दिले.प्रामुख्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपली कला आविष्कार सादर करण्याची संधी मिळाली असून गुणवत्ता शिक्षणासोबतच सांस्कृतिक विकासालाही निश्चितच चालना मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. दरम्यान अशोक साबळे बोलतांना म्हंटले की,वार्षिक स्नेहसंमेलन हे शालेय जीवनातील अविभाज्य अंग असून, धम्माल,मस्ती आणि आनंददायी शिक्षणाचा अपूर्व संगम आहे वार्षिक स्नेहसंमेलन सारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गरजेचे आहे.असे मत यावेळी व्यक्त केले.

# भारताच्या परराष्ट्र नीतीचे वाभाडे निघत असताना मोदींचे मौन घातक – प्रा. सुशीला मोराळे

बीड। प्रतिनिधी

इस्त्रायलचा एक चुकीचा पुरस्कार घेण्यासाठी मोदीजी अचानक इस्त्रायलला गेले त्यांना एक पदकही देण्यात आले मात्र हा पुरस्कार स्वीकारत असताना इस्त्रायलमधील विरोधी पक्षाचे लोक सभागृहातून उठून गेले हे दृश्य गोदी मीडियाने दाखवले नसले तरी जगाच्या मीडियाने हे दाखवले हे पदक व पुरस्कार पहिल्यांदाच नेत्यानाहुने सुरु करून तो मोदींना दिला आहे. हा दौरा का केला याचा खुलासा मोदींनी करायला पाहिजे मात्र ते बोलतच नाहीत. या युद्धखोरीचा निषेध करण्याऐवजी आता मोदीजी पाच राज्याच्या निवडणुकात जाहीर सभा फिरत असून नेहरूंच्या वरती टीका करत आहेत मोदीजींनी सार्वभौम भारताला अमेरिकेच्या हातात सोपवले आहे स्वातंत्र्योत्तर काळ कोणत्याही पंतप्रधानाच्या कारकिर्दीत परराष्ट्र धोरणाचे वाटोळे झाले नव्हते मोदीजी देश हितापेक्षा स्वतःची प्रतिमा जास्त जपतात असे सिद्ध होत आहे. इराणने भारताला पाकिस्तानच्या विरोधात सतत मदत केली अमेरिकेच्या निर्बंधामुळे भारताला रुपयात मदत केली खनिज तेल पुरवठ्यात भारताला मदत केली. पाकिस्तानने खादर बंदर चीनला विकून भारताची कोंडी केली तेव्हा इराणने आपल्या चाबहार बंधाराचा ताबा भारताला दिला मात्र तरीही अमेरिकेसमोर लाचारी पत्करून भारताच्या परराष्ट्र नीतीचे वाभाडे निघत असताना मोदीजींचे मौन घातक असल्याची प्रतिक्रिया प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिली आहे.

खोमेनिची हत्या झाली मोदीजी शांत राहिले चार दिवसांनी दुःख व्यक्त केले पाकिस्तान हा अमेरिकेचा मांडलिक देश असल्यासारखा आहे तरीही पाकिस्तानी पहिल्याच दिवशी दुःख व्यक्त केले इस्त्रायला जाहीरपणे समर्थन दिल्यामुळे त्यांनी भारताचे आभार मानले. ट्रम्प यांनी भारताला रशियाकडून तेल घेण्यास एक महिन्यापूर्वी परवानगी दिली हा उपकार म्हणजे भारताच्या सार्वभौमत्वावर हल्ला आहे, भारताने कोणाकडून तेल घ्यायचे हे अमेरिकेचे ट्रम्प ठरवत आहेत याचा अर्थ भारत का नाही बनला आहे का ? भारतीय संसदेत विरोधकांनी मागितलेली चर्चा नाकारली जात आहे. भारताच्या परराष्ट्र नीतीचे इतके अवमूल्यन कधीच झाले नव्हते. आपला भेकडपणा आपल्याला अडचणीत आणणार आहे. त्यामुळे एक जबाबदार नागरिक म्हणून आपण मोदीजींना आवाहन करत आहोत की मोदीजी आता तरी मौन सोडा. देशाचे परराष्ट्र धोरण कणखर ठेवा असे आव्हान प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

# अंजली शर्मा महानगरपालिका आयुक्त पदावर विराजमान




जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त म्हणून भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी श्रीमती अंजली शर्मा यांनी दिनांक ०६ एप्रिल २०२६ रोजी अधिकृतपणे पदभार स्वीकारन महानगरपालिका च्या आयुक्त पदावर विराजमान झाले.पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागांचा आढावा घेतला. जालना शहराचा विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि प्रलंबित नागरी प्रकल्पांना गती देणे ही आपली प्राथमिकता असेल, असे संकेत त्यांनी दिले आहेत.

यावेळी महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

# अमृत संस्थेच्या वतीने बीड जिल्ह्यात लक्षित गटाचे परिवार सर्वेक्षण

## ०८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत केले जाणार सर्वेक्षण

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी म्हणजे अमृत ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. संस्थेच्या योजना लक्ष्यित गटातील जास्तीत जास्त कुटुंबापर्यंत पोहोचाव्यात यासाठी अमृत संस्थेकडून संपूर्ण महाराष्ट्रातील लक्ष्यित गटातील कुटुंबांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. बीड जिल्ह्यात हे अमृत परिवार सर्वेक्षण अभियान ०८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत राबवले जाणार आहे.

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना इतर कुठल्याही संस्था किंवा महामंडळे यांचा लाभ मिळत नाही, त्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल म्हणजेच कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी असलेल्या घटकांसाठी अमृत संस्था काम करते. अमृत संस्थेच्या लक्ष्यित गटात सध्या ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगुनथर, जाट, कानबी, कोमटी/वैश्य अशा २५ जातींचा समावेश आहे. (सर्वेक्षणाअंती यात वाढ होण्याची शक्यता आहे.) विद्यार्थी, तरुण, महिला, व्यावसायिक, शेतकरी अशा विविध घटकांसाठी संस्थेच्या विविध योजना आहेत. या योजना लक्ष्यित गटातील जास्तीत जास्त कुटुंबापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी परिवार सर्वेक्षण केले जाणार आहे. अमृत संस्थेमार्फत लक्ष्यित गटाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. यात मुख्यत्वे पुढील प्रकारच्या योजनांचा समावेश आहे. त्यात व्यक्तिमत्त्व विकास, औद्योगिक व उन्नत कौशल्यविकास, रोजगारक्षम कौशल्यविकास, उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाह्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन, उद्योग/व्यवसायवृद्धीसाठी वैयक्तिक कर्ज व्याजपरतावा योजना आदींचा समावेश असून, लक्ष्यित गटाच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यवर्धित योजना सर्व घटकांतील व वयोगटांतील लाभार्थ्यांसाठी तयार करण्याचा मानस आहे. यासाठी लक्ष्यित गटातील कुटुंबाची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे, उपलब्ध स्थानिक संसाधने, उपलब्ध कौशल्य व आवडीनुसार विविध योजना तयार करण्यासाठी लक्ष्यित गटातील परिवाराचे सर्वेक्षण केले जाणार आहे. आवश्यकता वाटल्यास त्याचा कालावधी काही दिवसांसाठी वाढवण्यात येईल. या माध्यमातून लक्ष्यित गटातील जास्तीत जास्त कुटुंबांपर्यंत अमृत संस्थेच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच, अमृत संस्थेकडून सर्वांगीण विकासाच्या आणखी कोणकोणत्या योजना/उपक्रम राबवणे अपेक्षित आहे, याबद्दल विविध व्यक्तींची मते जाणून घेणे व त्या आधारावर नवीन आवश्यक योजना तयार करणे असा दुहेरी हेतू या सर्वेक्षणातून साध्य करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यामध्ये अमृत या संस्थेमार्फत वेळोवेळी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना/उपक्रम यांची माहिती वेळोवेळी सर्व संबंधितांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे. यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन अमृत संस्थेचे बीड जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी यांनी केले आहे.

# जिल्हाध्यक्षपदी संदीप धारे यांची निवड



जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा महसूल सेवक संघटनेच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारणीच्या जिल्हाध्यक्षपदी अंबड येथील महसून सेवक संदीप धारे यांची जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते निवड झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन महसूल सेवक सतीष राक्षे , अनिल मुंडे यांनी केले आहे.

तर जिल्हा उपाध्यक्षपदी अण्णासाहेब ढोबळे तसेच सचिव पदी तुकाराम सवळे यांची निवड करण्यात आली असून मार्गदर्शक दादासाहेब आठवले कार्याध्यक्ष म्हणून योगेश कान्हेरे यांची निवड करण्यात आली असून सर्व कार्यकारणीचे महसूल विभागाच्या वतीने व कर्मचाऱ्याच्या वतीने अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी संदीप घारे यांनी सांगितले की महसूल सेवकाच्या विविध प्रश्न संदर्भात व मागण्या संदर्भात मी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व पदाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करेल व सर्व महसूल सेवकांच्या सुखदुःखात खंबीरपणे उभा राहील.

# बस स्थानकाचे ना उद्घाटन ना हस्तांतरन तरी कंत्राटदाराची वकिली

## निकृष्ट बांधकामाला महामंडळाच्या अधिकाऱ्यांचा बिनशर्त पाठिंबा

बीड । प्रतिनिधी

येथील नव्या बस स्थानकाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले बस स्थानक सुरूही झाले मात्र अधिकृतरित्या व स्थानकाचे हस्तांतरण एसटी महामंडळाला संबंधित गुत्तेदाराने अद्यापही केले नाही एक एप्रिलच्या अवकाळी मध्ये गुत्तेदाराचे पितळ उघडे पडले आणि इमारतच गळू लागली संबंधित गुत्तेदार काझी संघानी ग्रुप वर कारवाई करण्याऐवजी महामंडळाच्या अधिकाऱ्याकडून गुत्तेदाराची पाठ राखण करणारा खुलासा केला जात आहे.





तब्बल १३ कोटी रुपये खर्च करून बीड जिल्ह्याच्या ठिकाणी भव्य असे बस स्थानक होत आहेत हे बस स्थानक काम अपूर्णच असले तरी पूर्ण झाले असल्याचे दाखवून या ठिकाणी बस डेपो सुरू केला गेला प्रवासासाठी निवाराही झाला बाहेरून सुंदर वाटणारी इमारत आतून मात्र पोकळ निघाली १ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसात संपूर्ण बस स्थानक पाण्याने गळू लागले आणि या काझी संघाने कंत्राटदाराचे पितळ उघडे पडले त्यादिवशी अक्षरशा प्रवासी पाण्याने भिजवून गेले होते या घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी आमदार संदीप क्षीरसागर माजी आमदार सय्यद सलीम यांनी या बस स्थानकाची पाहणी केली संबंधित गुत्तेदाराला निर्देश देणे ऐवजी त्यांनी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्याला सुनावले ही चूक संबंधित कंत्राटदाराची आहे महामंडळाची नाही मात्र त्यानंतर ही बाब लक्षात आली की बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याचे हस्तांतर महामंडळाकडे करावे लागते मात्र तसेही झालेले नाही तरीदेखील इमारत निकृष्ट काम झाले असल्याचे झालेल्या गळतीवरून स्पष्ट झाले यावरून संबंधित कंत्राट दारावर दंडात्मक कारवाई करणे उचित होते परंतु इथे झाले उलटे संबंधित कंत्राट दाराने या गळती संदर्भात खुलासा करण्याऐवजी चक्क एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी खुलासा केला ज्या महामंडळाच्या ताब्यात अधिकृतरित्या बस स्थानकाची इमारत आलेलीच नाही त्या इमारतीचा खुलासा करणे म्हणजे गुत्तेदाराच्या चुकावर पांघरून घालण्याचा प्रकार आहे आणि महामंडळाने केलेला खुलासा देखील हास्यास्पद असून तो कोणीही मान्य करणार नाही महामंडळाच्या मते पाचोळा आणि धूळ साचल्यामुळे पाणी व्यवस्थित खाली आले नाही आणि त्यामुळे छत गळू लागले धूळ आणि पाचोळा येण्यासारखा कोणताही प्रकार घटना नसतानाही हास्यास्पद खुलासा करणे म्हणजे संबंधित गुत्तेदाराला वाचवण्याचा हा एक केविलवाणा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.

### गुत्तेदारासह अधिकाऱ्यांवर कारवाई ची मागणी

**बीड बस स्थानकाच्या नव्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाले हे सिद्धच होत आहेत तेव्हा दर्जेदार काम करून घेणे किंवा त्यानंतर गुत्तेदारावर कारवाई करावी यासोबतच संबंधित गुत्तेदाराने हे काम महामंडळाकडे हस्तांतरित केले नसतानाही गुत्तेदाराच्या चुकावर पांघरून घालणारा खुलासा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ही वरिष्ठांनी कारवाई करावी अशी मागणी प्रवाशांमधून होत आहेत**




**दैनिक राज्य लोकतंत्रचे उपसंपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे, ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर, संपादक राजेंद्र होळकर, दैनिक नवराष्ट्र चे ब्युरो चीफ रवी उबाळे, संपादक विलास डोळसे, संजय मिसाळ, संजय शिंदे, दिलीप शिंगाडे आदी उपस्थित होते.**

# माजलगावात वाळू माफियांविरोधात लहुजी विद्रोही सेनेचा एल्गार; भव्य धरणे आंदोलन

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव येथे तहसील कार्यालयासमोर लहुजी विद्रोही सेना, महाराष्ट्र यांच्या वतीने बेकायदेशीर वाळू उपसाविरोधात दि. ७ रोजी भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत शासनाचे लक्ष वेधले.

या आंदोलनाचे नेतृत्व मातंग हृदयसम्राट लहुश्री भास्कर शिंदे (नानासाहेब) यांनी केले. यावेळी आंदोलकांनी शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेल्या वाळू घाटांबाबत तीव्र नाराजी व्यक्त




केली. ''वाढत्या वाळू माफियांच्या कारवायांमुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असून प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी,'' अशी मागणी करण्यात आली. आंदोलनादरम्यान तहसील कार्यालय परिसरात घोषणाबाजी करत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन विविध मागण्या मांडण्यात आल्या.

मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे

शासनाच्या निर्णयांचे उल्लंघन करून सुरू असलेले ८ वाळू घाट तात्काळ बंद करण्यासाठी मा. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठवावा, वाळू माफियांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, बेकायदेशीर वाळू उपशासाठी वापरली जाणारी व पोकलॅन यंत्रे जप्त करण्यात यावीत.

माजलगाव तालुक्यातील बेकायदेशीर वाळू उपसा पूर्णपणे बंद करावा. आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास येत्या काळात आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.या आंदोलनात शिवाजी कांबळे, राजेभाऊ खंडागळे, बप्पा कसबे, अनिल ढगे, विशाल गवळी, मंगेश शिंदे, कैलास गायकवाड, विलास लोखंडे, बाळू लोखंडे, रामभाऊ आलात, वैभव बडवणे, रोशन कसबे, सुनील थोरात, प्रदीप देशमाने, अमीर शेख, शुभम कसबे, नागनाथ आलात यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडवणी ते साळिंबा झालेल्या रस्त्याच्या कामाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय अंतर्गत वडवणी ते साळींबा या साडेपाच किलोमीटर रस्त्याचे व पुलाचे कामे अत्यंत बोगस करण्यात आलेले तरी या कामांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तहसीलदार व उपविभागीय अधिकारी सा. बा. वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत व इतरांनी दिला आहे.




सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय वडवणी अंतर्गत वडवणी ते साळींबा अंदाजे ५.३० कि.मी रोडचे काम गेल्या काही महिन्यापुर्वी झालेले असुन सदरील काम हे करोडो रुपये शासनाने खर्च करुन करण्यात आलेले असुन सदरील काम हे शासन नियमानुसार व इस्टीमेंन्ट नुसार झालेले नसुन गुत्तेदार (एजन्सीने) हे काम थातुरमातुर केलेले आहे.तरी काही महिन्यातच सदरील रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडलेले आहेत व सदरील रोड वरील पुलाचे काम ही निष्कृष्ट दर्जाचे झालेले आहेत. २० ते २५ गावच्या ग्रामस्थांना व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तरी वडवणी ते साळींबा या ५.३० कि.मी अंतराच्या कामाची वरिष्ठ कंट्रोलर मार्फत चौकशी करुन सदरील गुत्तेदार ◀◀ पान ३ वर

# महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सवानिमित्त विविध स्पर्धा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील महात्मा ज्योतिराव फुले स्मारक समिती अंबाजोगाई यांच्या वतीने रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिराव फुले व संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला. या जयंती उत्सावानिमित्त महात्मा फुले स्मारक स्थळावर शालेय विद्यार्थ्यांसाठी, महाविद्यालयीन तरूणांसाठी तसेच महिलांसाठी



विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे अशी माहिती महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

या संयुक्त जयंती विशेष स्पर्धा महोत्सव २०२६ खालील प्रमाणे होणार आयोजित करण्यात आल्याची माहिती स्पर्धेचे समन्वयक प्रा.मिलिंद ढगे व सचिव रत्नदीप गोरे यांनी दिली आहे. स्पर्धेचे ठिकाण – महात्मा फुले स्मारक समिती महात्मा फुले स्मारक रोड, एल.आय.सी ऑफिसच्या जवळ, अंबाजोगाई (जिल्हा बीड) स्पर्धेचे वयोगट पुढीलप्रमाणे आहेत. बालगट (इयत्ता १ली ते ४ थी) – रंगभरण स्पर्धा दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ सायंकाळी ६ ते ७ वाजता. सहभागी स्पर्धकांना महापुरूषांचे चित्र दिले जाईल चित्रात आकर्षक रंग भरायचे आहेत. स्पर्धकांनी रंग स्वतः घेऊन यावेत. आयोजकांकडून फक्त ड्रॉइंग पेपर दिला जाईल. सामान्यज्ञान स्पर्धा – गट १ (इयत्ता ५ वी ते ८ वी), विषय – जीवनचरित्र, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ दुपारी २ ते ३ वाजता. ◀◀ पान ३ वर

महात्मा फुले युवा दलाकडून फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार जाहीर

# डॉ. नंदकुमार पालवे व आरती पालवे दांपत्याचा राज्यस्तरीय सन्मान

बीड । प्रतिनिधी

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या व सामाजिक–शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दांपत्यांचा दरवर्षी सन्मान करण्याची परंपरा महात्मा फुले युवा दलाच्या वतीने जपली जाते.



महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त दिल्या जाणाऱ्या फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार सन २०२६ २७ साठी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील बेलखेड येथील सेवा संकल्प प्रतिष्ठानचे डॉ. नंदकुमार पालवे व सौ. आरती नंदकुमार पालवे या दांपत्याची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे यांनी दिली. हा राज्यस्तरीय पुरस्कार दरवर्षी एका दांपत्याला दिला जातो. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, फुले पगडी, साडी–चोळी आणि ११,००० रुपये रोख असे आहे. ◀◀ पान ३ वर

# डॉ.गंगेश पटकूटवार यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

दि ०७ एप्रिल २०२६..येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉक्टर गंगेश लिंगराज पटकूटवार वय ४८ वर्षे यांचे आज पहाटे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले.



डॉक्टर गंगेश पटकूवार हे होमिओपॅथी फार्मसी विभागात असोसिएट प्रोफेसर म्हणून काम पाहत होते. त्यांनी एमडी होमिओपॅथी या विषयात पदवी घेतली होती. त्या व्यतिरिक्त सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा सहभाग असायचा त्यांच्या आकस्मिक जाण्याने महाविद्यालयाचे मोठे नुकसान झाले आहे.

आज त्यांना महाविद्यालयाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे सल्लागार डॉक्टर अरुण भस्मे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर महेंद्र गौशाल तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्व पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. डॉक्टर गंगेश पटकूवार यांच्या पाश्चात त्यांची पत्नी दोन मुली एक मुलगा एक भाऊ असा परिवार आहे.

# सेवानिवृत्त ग्रामसेवकाने केले युसूफवडगांव ग्रामपंचायत कार्यालयातुन अभिलेखे गायब

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुकातील युसूफवडगांव येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे तात्कालीन ग्रामसेवक खाडप हे ३ महिन्यापूर्वीच सेवानिवृत्त झाले आहेत पण अद्याप त्यांनी चार्ज तर सोडलाच नाही पण कार्यालयातुन अभिलेखे सुद्धा गायब केल्यामुळे नागरिकांना अडचणीचा सामना करण्याची वेळ आली आहे.

केज तालुकातील मोठ्या ग्रामपंचायत पैकी युसूफवडगांव ही एक मोठी राजकीय दृष्ट्या मोठी ग्रामपंचायत म्हणुन ओळखली जाते.पण गेल्या काही महिन्यापासुन तात्कालीन सेवानिवृत्त ग्रामसेवक खाडप यांनी केलेल्या चुकीमुळे गावकऱ्यांवर पश्चतापाची वेळ आली आहे.झाले असे की ३१ डिसेंबर २०२५ रोजी तात्कालीन ग्रामसेवक खाडप हे सेवानिवृत्त झाले होते त्यानंतर त्यांच्या जागी पंचायत समिती कार्यालयातुन नकाते नामक ग्रामविकास अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली होती पण तात्कालीन ग्रामसेवक खाडप यांनी सेवानिवृत्त होऊन पण अजुन पर्यंत चार्ज तर सोडलाच नाही पण ग्रामपंचायत कार्यालयातुन अभिलेखे गायब केले आहेत त्यामुळे नवीन नेमणुक केलेल्या ग्रामविकास अधिकारी नकाते यांनी चार्ज स्विकारलाच नाही त्यामुळे गेल्या ३ महिन्यापासून गावाला ग्रामसेवक नसल्यासारखे झाले आहे त्यामुळे नागरिकांना ◀◀ पान ३ वर

# वाघोरा येथील भीमजयंती कार्यकारिणी जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघोरा येथे दरवर्षीप्रमाणे विश्वभूषण महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बैठक घेऊन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली ती पुढीलप्रमाणे अध्यक्षपदी इंजि.शुभम भास्करराव माने,उपाध्यक्ष राहुल रामकिसन माने,सचिव अक्षय शिरसाट,सहसचिव ऋषिकेश माने,खजिनदार शंकर माने,कोषाध्यक्ष यशपाल मोरे,आदींचा समितीमध्ये समावेश आहे. बैठकीला उपस्थित ग्रामपंचायत सदस्य राहुल शिरसाठ,अण्णाभाऊ माने ज्ञानेश्वर माने,सुंदर माने, मनोहर माने,बबन माने, सिद्धार्थ माने,कारभारी माने, श्रीमंत माने,भागवत माने, उत्तम माने,बाळू मोरे,राहुल मोरे,प्रमोद माने,संभाजी सपाटे,नितीन शिरसाट,दीपक भिसे,नितीन मकरंद,दादा ससाने,प्रेमकुमार माने, यांच्यासह मोठ्या संख्येने गावातील नागरिक उपस्थित बैठक पार पडली.



तसेच जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर,रांगोळी स्पर्धा,भाषण स्पर्धा,भीम गीतांचा ऑर्केस्ट्रा तर २७ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशांच्या गजरात फुलांची उधळण करत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

# ॲड. तेजस नेहरकर यांच्या प्रबळ युक्तिवादाने गंभीर गुन्ह्यातील आरोपीला जामीन

बीड । प्रतिनिधी

खासगी शिकवणीला (ट्युशनला) गेलेल्या एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली अटकेत असलेल्या आरोपीला केज न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. याप्रकरणी आरोपीच्या वतीने ॲड. तेजस नेहरकर यांनी मांडलेला प्रबळ बचावाचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने हा निर्णय दिला.



या बाबत अधिक माहिती अशी की, पीडित मुलगी ही दहावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. घटनेच्या दिवशी ती सकाळी ६ वाजेच्या सुमारास खासगी शिकवणीसाठी (ट्युशनसाठी) घरातून बाहेर पडली होती. खासगी शिकवणीचे तास ट्युशन संपल्यानंतर घरी परतत असताना, आरोपी गणेश हनुमान हिंदोळे (रा. केज) व त्याच्या एका सहकाऱ्याने तिचा पाठलाग केला. उमरी रोड, केज परिसरातून तिला लग्नाचे आमिष दाखवून बळजबरीने कारमध्ये बसवून पळवून नेले. आरोपींनी पीडितेला आंबा चोंडी (ता. धारूर) येथील घाटातील डोंगराळ भागात नेले, तिथे तिच्यावर अत्याचार केला. या धक्कादायक घटनेनंतर पीडितेच्या तक्रारीवरून केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तत्परतेने तपास चक्रे फिरवून आरोपींना अटक केली होती. दरम्यान पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण करून केज येथील विशेष न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल केले. या खटल्याचा स्पेशल केस नंबर १३/२०२६ असा आहे. खटल्याच्या सुनावणी दरम्यान आरोपीच्या ◀◀ पान ३ वर

# रामरक्षा स्तोत्र पठण स्पर्धेत चि.समर्थ नखातेचे यश

माजलगाव । प्रतिनिधी

पुणे येथील प्रसिद्ध शिव एस्ट्रोलॉजी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय रामरक्षा स्तोत्र पठण स्पर्धेत माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील चि. समर्थ रामेश्वर नखाते याने घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत समर्थने द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याच्या लौकिकात भर घातली आहे. त्याच्या या यशाबद्दल सुप्रसिद्ध वेदमूर्ती कृष्णा देवा जोशी पात्रुडकर यांच्या हस्ते त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.या प्रसंगी



पात्रुड गावातील व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.०८ एप्रिल २०२६ । पान ७

# ऋषिकेश वैद्यची शेंडीबाबत अजब मागणी मान्य; पुणे न्यायालयाचे कारागृह प्रशासनाला दिले आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

एकीकडे नाशिकमधील भोंदु अशोक खरात (–िहेज्ञ घहरीरीं) प्रकरण गाजत असतानाच दुसरीकडे वसईतील आपण महादेवाचा अवतार असल्याचं सांगून पुण्यातील एका विवाहित महिलेवर अत्याचार करणार्या ऋषिकेश वैद्य (ठळीहळज्ञशीह तरळवूर) या भोंदुबाबाचे बिंग फुटले. एका महिलेने दिलेल्या फिर्यादीनंतर पोलीस त्याचा शोध घेत होते. गुन्हा दाखल झाल्याची माहिती समजताच तो पसार झाला. पुणे शहर पोलिसांच्या विशेष पथकांसह मांजरी पोलिसांनी त्याचा शोध घेऊन त्याला पिंपरी परिसरातून अटक केली आहे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी लष्कर न्यायालयाने दोन्ही पक्षांकडून युक्तिवाद ऐकल्यानंतर त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनवण्यात आली आहे. यावेळी ऋषिकेश वैद्यच्या (ठळीहळज्ञशीह तरळवूर) वकिलांनी अजब मागणी केली होती. तुरुंगामध्ये वैद्य याचे केशवपन करू नये, अशी मागणी वैद्यच्या वकिलांनी केली होती, त्या मागणीबाबत पुणे न्यायालयाचे कारागृह प्रशासनाला आदेश दिले आहेत, त्यामध्ये भोंदू ऋषिकेश वैद्यची (ठळीहळज्ञशीह तरळवूर) शेंडी कापू नये असं म्हटलं आहे.

भोंदू बाबा ऋषिकेश वैद्य प्रकरणात वैद्यची शेंडी (ठळीहळज्ञशीह तरळवूर) कापू नये असे आदेश पुणे न्यायालयाने



कारागृह प्रशासनाला दिले आहेत. दैविशक्तीचा संचार असल्याची बतावणी करून वैद्य यांनी एका महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. यामुळे वैद्य याला पोलिसांनी गेल्या आठवड्यात अटक केली होती. काल त्यांची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला येरवडा कारागृहात पाठवण्यात आले आहे. यावेळी वैद्य (ठळीहळज्ञशीह तरळवूर) याच्या वकिलांनी वैद्य यांच्या डोक्यावरील शेंडी ही धार्मिक बाब आहे ती कापू नये अशी विनंती केली, याबाबत अर्ज केल्यांनंतर न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. नाशिकमधील अशोक खरातचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर पुण्यातील विवाहितेने हिंमत करुन हा सर्व प्रकार आपल्या पतीला सांगितला. पीडित महिला ही मुळची पुण्याची आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये महिलेची सोशल मीडियाद्वारे भोंदू ऋषिकेश वैद्य याच्याशी ओळख झाली होती. वैद्य हा मुळचा वसईतील राहणारा आहे. त्याने या महिलेला आपल्या जाळ्यात ओढले. माझ्या अंगात दैवी संचार आहे. ईश्वराची उपासना कशी करायची याचे तंत्र तुला शिकवतो, असं त्याने त्या विवाहितेला सांगितलं. २०२३ मध्ये तो पुण्यात आला. त्याने या महिलेची एका लॉजवर भेट घेतली. तिला त्याने गुंगीचे औषध देऊन मी महादेवाचा अवतार आहे. तू माझी पार्वती असं बोलून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर त्याने तिला पुन्हा वसईत बोलावले आणि तेथेही तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता, असा आरोप महिलेने केला आहे. या प्रकरणी वसईतील माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तो मांजरी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. वसई आणि पुणे पोलिस ऋषिकेश वैद्य याचा शोध घेत होते. तो पिंपरी परिसरात असल्याचे समजल्यावर पोलिसांनी त्याला अटक केली.


दरम्यान, पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, ऋषिकेश वैद्य याने २०२३ मध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्याशी ओळख वाढवली. स्वतःला 'शंकराचा अवतार' सांगत आणि महिलेला 'तू माझी पार्वती आहेस' असे सांगून त्याने तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर पुण्यात भेटीत लॉजमध्ये नेऊन गुंगीचे औषध देत बलात्कार केल्याचा आरोप आहे. तसेच, वसईत पुन्हा लैंगिक अत्याचार केल्याचेही महिलेने सांगितले असून त्यानंतर आरोपीने फोटो आणि व्हिडिओच्या आधारे तिला ब्लॅकमेल केल्याचा गंभीर आरोप आहे. २०२५ पर्यंत हा प्रकार सुरू असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

## नवऱ्याने पत्नीला अपघाताच बनाव रचून कायमचं 'शांत' केलं, संशयाचं भूत

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील बिबवेवाडी येथून एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे, चारित्र्यावर संशय घेत पत्नीची हत्या करून ती इमारतीवरून पडल्याचा बनाव रचणाऱ्या पतीचा (झींपश उीळाश छशुी) पोलिसांनी पर्दाफाश केल्याचं समोर आलं आहे. हत्या करून पतीने पत्नीला रुग्णालयात दाखल केलं. पत्नीचा अपघाती मृत्यू झाल्याचं सांगत पतीने पोलिसांना फसवण्याचा प्लॅन केला होता. संशय येऊ नये म्हणून सोज्वळपणाचा (झींपश उीळाश छशुी) आव आणला होता. सारिका घोडके (वय २३) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. तर शुभम श्रीकांत घोडके (वय २९) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही सगळी घटना पुण्यातील बिबवेवाडी येथे घडली.



सारिका आणि शुभम यांचे काही महिन्यांपूर्वी लग्न झाले होते. पती शुभम वारंवार सारिका वर संशय घेत होता. २४ मार्च रोजी त्यांच्यात वाद झाले आणि रागाच्या भरात शुभमने सारिकाला मारहाण केली. इतकचं नाही तर स्वयंपाक घरातील अनेक वस्तूंनी तिच्यावर वार केले. मारहाणीत सारिका गंभीर जखमी झाली. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या सारिकाला पतीने रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच बिबवेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक पाहणीतच पोलिसांना संशय आला. दरम्यान, पोलिसांनी पती शुभम कडे चौकशी करण्यास सुरुवात केली. शुभमने सारिका 'गॅलरीतून पडल्याने मृत्यू झाला' असा दावा केला. घटनास्थळावरील परिस्थिती आणि जखमांचे स्वरूप पाहता पोलिसांचा संशय वळवला. संबंधित घटनेचा पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण केलं असता हा अपघात नसून खून असल्याचं स्पष्ट झालं. पोलिसांनी पुन्हा शुभमची चौकशी केली. यावेळी शुभम उत्तर देताना अडखळत होता. पोलिसांचा संशय बळावला आणि त्याच्या विरोधात पुरावे सापडल्यानंतर शुभमला तात्काळ ताब्यात घेतले आणि खाकीचा हिसका दाखवताच पत्नीची हत्या केल्याची त्याने कबुली दिली. बिबवेवाडी पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरू आहे. (झींपश उीळाश छशुी)


घटनेनंतर आरोपीने पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तसेच, शेजाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार पती-पत्नीमध्ये वारंवार वाद होत असल्याचेही समोर आले असून, संशयाच्या कारणातूनच हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध खूनाचा गुन्हा नोंदवत अधिक तपास सुरू ठेवला असून, घटनेमागील नेमकी कारणे आणि इतर कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास केला जात आहे.

## कैलास सत्यार्थी यांना 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार २०२६' जाहीर; पुण्यात रंगणार दिग्गजांचा गौरव सोहळा

**पुणे । प्रतिनिधी**

नोबेल शांतता पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांना यंदाचा मानाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. पद्मश्री पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी ही घोषणा केली असून मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून हा सोहळा पार पडणार आहे.

मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान आणि हृदयेश आर्ट्स तर्फे सकाळ माध्यम समूहाच्या सहकार्याने आयोजित केला जाणारा हा कार्यक्रम देशातील एक अत्यंत प्रतिष्ठित सांस्कृतिक उपक्रम मानला जातो. कला, साहित्य आणि समाजसेवा या क्षेत्रांत अष्टपैलू योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना सन्मानित करण्याची परंपरा या निमित्ताने



यंदाही जपली जाणार आहे.

विविध क्षेत्रांतील नामवंतांचा समावेश –

या वर्षाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये विविध क्षेत्रांतील नामवंतांचा समावेश आहे. संगीत क्षेत्रातील योगदानासाठी महेश काळे आणि नृत्य क्षेत्रासाठी शमा भाटे यांना गौरवण्यात येणार आहे. रंगमंच आणि चित्रपट विभागातून सुबोध भावे यांना, तर सिनेमा क्षेत्रासाठी रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी यांना हा सन्मान प्रदान केला जाईल.

पत्रकारितेतील योगदानासाठी सुशील कुलकर्णी, साहित्यासाठी अच्युत गोडबोले आणि विशेष पुरस्कारासाठी डॉ. धनंजय केळकर यांची निवड करण्यात आली आहे. समाजसेवेच्या गटात ठाण्यातील वसुंधरा संजीवनी मंडळाचे आनंद भागवत यांचा सत्कार होईल. तसेच 'मोहन वाघ पुरस्कार' यंदा जिगीषा अष्टविनायक निर्मित 'भूमिका' या नाटकाला देण्यात येणार असून, मुख्य अभिनेता सचिन खेडेकर यांच्यासह निर्माते दिलीप जाधव आणि श्रीपाद पद्माकर यांनाही सन्मानित केले जाईल.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराचे' हे पाचवे वर्ष आहे. कैलास सत्यार्थी यांनी मुलांच्या अधिकारांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी केलेल्या अतुलनीय कार्याचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून केला जाणार आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक–अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड हे या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विज्ञान, अध्यात्म आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा प्रसार करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्या उपस्थितीला विशेष महत्त्व आहे.

## विमाननगरमधील अवैधरित्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेचा छापा

**पुणे । प्रतिनिधी**

वमाननगर येथील टलान्टिस रुफ टॉप लाऊंज हॉटेलमध्ये अवैधरित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेच्या (झींपश छशुी) अमली पदार्थ विरोधी दोनच्या पथकाने छापा टाकला. यावेळी तेथे मोठ्या प्रमाणात हुक्का विक्री सुरू असल्याचे समोर आले आहे.

याप्रकरणी, पोलिसांनी हॉटेल मालक, मॅनेजर, वेटरसह सात जणांना पकले असून, त्यांच्या विरुद्ध विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा (झींपश छशुी) दाखल केला आहे. यावेळी हॉटेलमधून हुक्का पॉट, विदेशी दारुच्या बाटल्या, व इतर साहित्य असा १ लाख ४७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्वप्निल शांताराम तांबे (वय.३२), अमेय मुकेश अजमीरे (वय.२८,राहणार दोघे वाघोली), नवरंग विठ्ठलराव कोल्हे (वय.२८,रा.विमाननगर), अमितकुमार दयालजी गोयल



(वय.२६), कमरुल इस्लाम लष्कर (वय.२६), शिवमकुमार श्रीरामराज यादव (वय.२३), माहरुफ अफताफउद्दीन आलम (वय.१८,राहणार सर्वजण खराडी) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

कोम्बिग ऑपरेशनच्या पार्श्र्वभूमीवर अमली पदार्थ विरोधी पथक दोन गस्तीवर होते. त्यावेळी टलान्टिस या हॉटेलमध्ये अवैधरित्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस उपायुक्त (झींपश छशुी) गुन्हे निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक पंडीत रेजितवाड, सहायक पोलिस निरीक्षक नितीन नाईक, कर्मचारी राजेस शेख, पृथ्वीराज पांडुळे, संदीप देवकाते, दिनेश बास्टेवाड, सतीश चव्हाण, प्रशांत कळसकर, वैशाली माकडी यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## दुसऱ्या लग्नाच्या हव्यासापोटी पोटच्या मुलाचा काटा काढला; आईनेच ११ महिन्यांच्या चिमुरड्याला ओट्यावर आपटून मारलं

**शिरूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातून माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शिरूर तालुक्यातील भांबर्डे गावात एका निर्दयी आईने आपल्या अवघ्या ११ महिन्यांच्या पोटच्या मुलाची सिमेंटच्या ओट्यावर आपटून हत्या केली. धक्कादायक म्हणजे, पुरावा नष्ट करण्यासाठी तिने चिमुरड्याचा मृतदेह बॅगेत दगड भरून विहिरीत फेकून दिला. मात्र, रांजणगाव पोलिसांनी अवघ्या काही तासांत या क्रूर घटनेचा पर्दाफाश केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, भांबर्डे येथील रहिवासी रवींद्र अशोक पवार यांनी आपला ११ महिन्यांचा मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. पोलिसांना सुरुवातीपासूनच मुलाची आई, पूजा रवींद्र पवार हिच्या वागण्यावर संशय येत होता. पोलिसांनी जेव्हा पूजा पवारची कसून चौकशी केली, तेव्हा तिने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसांनी खाक्या दाखवताच तिने गुन्ह्याची कबुली दिली. मला दुसरे लग्न करायचे आहे आणि जर मुलगा सोबत असेल तर दुसरे लग्न करता येणार नाही, या विकृत विचारातून तिने स्वतःच्या पोटच्या गोळ्याचा जीव घेतल्याचे कबूल केले. आरोपी महिलेने मुलाला सिमेंटच्या ओट्यावर जोराने आपटले, ज्यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर कोणालाही संशय येऊ नये म्हणून तिने मुलाचा मृतदेह एका कापडाच्या बॅगेत भरला. बॅग पाण्यावर तरंगू नये म्हणून तिने त्यात जड दगडही भरले आणि ती बॅग गावातील एका विहिरीत फेकून दिली. पोलिसांनी विहिरीतून मुलाचा मृतदेह बाहेर काढला असून तो उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. रांजणगाव पोलिसांनी आरोपी महिला पूजा पवार हिला अटक केली असून तिच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## होर्डिंगवर आता 'क्यूआर कोड' सक्तीचा! पीएमआरडीएची मोठी कारवाई; एजन्सींचे धाबे दणाणले

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत बेकायदा आणि धोकादायक होर्डिंगचे फुटलेले पेव आता मोडीत काढले जाणार आहे. महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यासंदर्भात अतिक्रमण निर्मूलन विभागाला कठोर कारवाईचे आदेश दिले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या होर्डिंगधारकांवर थेट कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, अनधिकृत होर्डिंगधारकांना रीतसर परवानगी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ही शेवटची संधी असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. पीएमआरडीएच्या



हद्दीतील मुळशी, मावळ, हवेली, खेड आणि शिरूर या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदा होर्डिंग उभारण्यात आले आहेत. यासंदर्भात नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत, सोमवारी आकुर्डी येथील मुख्यालयात महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीस विकास परवानगी विभागाचे संचालक अविनाश पाटील, उपायुक्त आशा होळकर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

क्यूआर कोड आणि जिओ फेन्सिंग सक्तीचे

महानगराचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आता होर्डिंगसाठी ऑनलाइन परवानगी प्रक्रिया राबवली जाणार आहे. यापुढे प्रत्येक अधिकृत फलकावर क्यूआर कोड आणि जिओ फेन्सिंग असणे बंधनकारक असेल. ज्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत किंवा ज्यांनी अद्याप शुल्क (चलन) भरलेले नाही, त्यांना परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याची ही अंतिम संधी असेल. ज्यांना नोटिसा बजावूनही त्यांनी अनधिकृत फलक हटवलेले नाहीत, त्यांच्यावर याच आठवड्यापासून निष्कासनाची धडक मोहीम उघडली जाणार आहे.

होर्डिंगधारकांशी ९ एप्रिलला चर्चा

प्रशासनाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी आणि एजन्सींचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी महानगर आयुक्तांनी गुरुवारी (ता. ९) दुपारी १:३० वाजता विशेष बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक आयुक्तांच्या दालनात पार पडणार असून, त्यानंतर कठोर अंमलबजावणीला सुरुवात होईल.

## पुण्यात मद्यधुंद कारचालकाचा थरार; ४–५ वाहनांना धडक; वाहतूक पोलिसाच्या अपहरणाचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

वारजे परिसरात मंगळवारी दुपारी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मद्यधुंद अवस्थेत कार चालवणाऱ्या चालकाने भरधाव वेगात ४ ते ५ वाहनांना धडक दिलीच, शिवाय कारवाईसाठी गेलेल्या वाहतूक पोलिसाच्या अपहरणाचा प्रयत्न केल्याने परिसरात खळबळ उडाली.

या प्रकरणी संजभेग सुरेश माने (वय ३०) याला वारजे पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्राथमिक तपासात संबंधित चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उत्तमनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र क्षीरसागर हे न्यायालयीन कामकाजासाठी शिवाजीनगरकडे जात असताना शिवणे ते वारजे माळवाडी दरम्यान एक कार भरधाव वेगात जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या कारने मार्गात काही वाहनांना धडक देत पुढे पळ काढल्याची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ पाठलाग सुरू केला. वारजे चौकाजवळ संबंधित कारने एका टेम्पोला धडक दिली. त्यानंतर क्षीरसागर यांनी धाडसाने कार ओव्हरटेक करून थांबवली. त्यांनी जवळील वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांना बोलावून चालकाला पोलीस चौकीत घेऊन जाण्याच्या सूचना दिल्या.

मात्र, वाहतूक पोलिस कर्मचारी कारमध्ये बसताच चालकाने अचानक वेग वाढवत कार पुढे दामटली. त्यामुळे काही काळ त्या कर्मचाऱ्याच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला.

## ड्रग्ज घेणाऱ्यांची खैर नाही! सरपंचासह ३ महिला पोलिसांच्या जाळ्यात; ३५० जणांची 'हिट लिस्ट' तयार

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या एमडी (मेफेड्रोन) ड्रग्जच्या विळख्याला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी आता थेट सेवन करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. गुन्हे शाखेने सोमवारी १७ जणांना पोलीस आयुक्त कार्यालयात चौकशी केली. यामध्ये दोन–तीन महिलांसह एका सरपंचाचाही समावेश असल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासमोर या सर्वांना हजर करण्यात आले.



उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे आणि सहायक आयुक्त शंकर खटके यांच्या उपस्थितीत त्यांची चौकशी करण्यात आली. एमडी ड्रग्ज सेवन करणाऱ्यांची संख्या सुमारे तीनशे ते साडेतीनशेच्या घरात असून या सर्वांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. उत्तमनगर पोलिसांनीही या प्रकरणात धडक कारवाई करत आतापर्यंत सहा ड्रग विक्रेत्यांना अटक केली आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी सुनील उर्फ राठ्या राठोड याला कोंढवे धावडे परिसरातून ताब्यात घेतले असता त्याच्याकडे एमडीच्या पुड्या सापडल्या. त्यानंतर चौकशीदरम्यान त्याने अनेक तरुणांना ड्रग्ज विक्री केल्याचे तसेच काहीजणांकडून ड्रग्ज खरेदी केल्याचेही उघड झाले. या कारवाईत राजन गोपाल नायर, जतीन जयवंत कदम आणि शुभम संतोष दहिभाते यांनाही अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी २ लाख ३६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून त्यामध्ये ८.१९ ग्रॅम एमडी आणि एक दुचाकीचा समावेश होता. या प्रकरणी उत्तमनगर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ड्रग विक्रीसाठी पोर्टर सेवेचा वापर

राठोडच्या मोबाईल तपासात मोठी माहिती हाती आली असून गेल्या चार महिन्यांत त्याने ३०० हून अधिक व्यवहार केल्याचे आढळले आहे. या व्यवहारांची एकूण रक्कम सुमारे ९ लाख असून बहुतेक व्यवहार दोन ते अडीच हजारांच्या आसपास आहेत. काही व्यवहार १० ते १५ हजार रुपयांपर्यंत असल्याचेही समोर आले आहे. या सर्व व्यवहारांमुळे ड्रग्ज विक्रीसाठी ऑनलाईन नेटवर्कचा आणि पोर्टर सेवेचा वापर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

तपासादरम्यान ड्रग्ज विक्रेते आणि सेवन करणारे अशा एकूण ७६ जणांची माहिती पोलिसांना मिळाली असून त्यांच्या शोधासाठी प्रयत्न सुरू आहेत. पुढील तपासात ड्रग्ज पुरवठ्याची साखळी आणि मोठ्या पुरवठादारांपर्यंत पोहोचण्यावर पोलिसांचे लक्ष केंद्रित आहे. या पार्श्वभूमीवर शहरात आणखी मोठ्या कारवाया होण्याची शक्यता आहे.

उत्तमनगर पोलिसांनी आजवर सहा ड्रगविक्रेत्यांना अटक केली आहे. तीघांचा शोध सुरु आहे. तपासात आणखी एकाचे नाव निष्पन्न झाले आहे. यामुळे विक्रेत्यांची संख्या दहावर गेली आहे. सेवन करणाऱ्या दहा–पंधरा जणांना ताब्यात घेऊन त्यांची वैद्यकीय चाचणी करण्यात आली . जप्त ड्रग दहा ग्रॅम पर्यंत गेले आहे.

## मुलांच्या शिक्षणासह घरखर्चाची जबाबदारी दोघांची; कौटुंबिक न्यायालयाचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

मुलांच्या शिक्षणासह घरखर्चाची जबाबदारी पती-पत्नीची आहे. दोन्ही मुलांच्या अर्ध्या शिक्षण खर्चाबरोबरच अर्धा घरखर्च करण्याचा आदेश कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश शाम रुक्मे यांनी दिला आहे. यामध्ये पतीच्या वतीने ड.अर्जून व्हजगे यांनी काम पाहिले.

या प्रकरणात पती–पत्नी एकाच घरात राहत आहेत. दोघांना १७ वर्षाचा मुलगा, १५ वर्षाची मुलगी आहे. पत्नीने क्रुरतेच्या आधारावर घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. त्यानंतर तिने पोटगीसाठीही अर्ज केला होता. दोघे एका घरात राहत आहेत. पत्नीचे एम.ए.बी.एड. शिक्षण झाले आहे. ती सध्या पीएच. डी करत आहे. उत्पन्नाचे साधन नाही. तिचा दरमहा खर्च ६५ हजार रुपये आहे. पतीचा डिप्लोमा झाला आहे. त्याला दरमहा ९० हजार रुपये पगार आहे.



त्यामुळे पत्नीने दैनदिन उपजिविका आणि शैक्षणिक खर्च देण्याचे मागणी केली. त्यास पतीच्या वतीने ड.अर्जून व्हजगे यांनी विरोध करण्यात आला. पत्नी मुलांच्या खर्चाची जबाबदारी उचलत नाही. तिची शैक्षणिक गुणवत्ता पतीपेक्षा जास्त आहे. तिने लग्नानंतर सहायक प्राध्यापक म्हणून नोकरी केली आहे. ती सध्या पीएच.डी करत आहे. दोघांचा २२ वर्षाचा संसार आहे. अनेक संगणकाचे कोर्स केले आहेत. पतीच्या सहकार्याशिवाय शक्य नसल्याचे त्याचे म्हणणे होते. त्यानुसार पत्नीला उत्पन्न आहे, हा पतीचा बचावाचा मुद्दा मान्य करत न्यायालयाने वरील आदेश दिला.